दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ५ वे अंक -२०२ गुरूवार,दि.२७ मार्च २०२५ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-5th Issue-202 Thursday, Dt.27 March 2025 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

## भर कोर्टाच्या आवारात महिलेस मुजोर व्यक्तीकडून मारहाण

बीड ।प्रतिनिधी

येथील शिवाजी महाराज चौक परिसरातील कोर्ट आवारात अचानक रित्या एक महिला व पूरुष यात चांगलेच रण - संग्राम झालेचे आज पहावयास मीळाले. हि घटना आज दुपारी तीन वाजेच्या सुमारास कोर्टा आवारात पहावयास मीळाली. त्या मूजोर व्यक्तीने महिलेस धपाधप असे चांगलेच फटके दिले. मात्र ईत्क्यात एक ए एस आय फौजदार यांना ही खबर बात दिस्ताच तेंनी लगेच घावा घाव करून त्या मूजोर यूवकाला पकडत दूर केले यामुळे प्रकरण निवळले, तरी पण तो यूवक धूसमुस करतच होता..असे बघ्यांनी सांगीतले. ऐन वेळी पोलिस यांनी मध्यस्थी मदत केल्या बद्दल समाजातून पोलिस विषयी समाधान व्यक्त केले जात आहे.

# घटनेच्या प्रत्येक तारखेचा आमच्याकडे पुरावा - निकम; पुढील सुनावणी १० एप्रिलला

## संतोष देशमुखांची हत्या मोठ्या कटाचा परिपाक



### आरोपींची संपत्ती जप्त करण्यासाठी न्यायालयात निवेदन

हा कट दोन किंवा दोघांपेक्षा अधिक आहेच, परंतु हा कसा वाढत गेला आणि यातील आरोपी कसे दोषी आहेत. यातील फरार आरोपी कृष्णा आंधळेचाही गुन्ह्यात सहभाग कसा आहे, याबाबत आम्ही न्यायालयाला विषद केले. काही महत्त्वाच्या साक्षीदारांची ओळख गोपनीय ठेवावी, अशी न्यायालयाला विनंती केली आहे. आरोपींची संपत्ती संघटीत गुन्हेगारी कायद्याखाली जप्त करावी, अशीही विनंती आज न्यायालयाला केली. त्यानुसार न्यायालयात अर्ज केलेले आहेत, अशी माहिती वकील उज्वल निकम यांनी दिली.

### प्रत्येक तारखेबाबत आमच्याजवळ पुरावा

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचा खून एका मोठ्या कटाचा परिपाक आहे. हा कट कसा शिजला हे तारखेप्रमाणे न्यायालयाला सांगितले. त्याचप्रमाणे प्रत्येक तारखेबाबत आमच्याजवळ पुरावा आहे, असा देखील दावा न्यायालयात केला. विशेषत: वाल्मीक कराडने ज्याप्रमाणे धमकी दिली, त्याप्रमाणे गँग लीडर सुदर्शन घुले तिथे प्रत्यक्ष आला. सुदर्शन घुलेने देखील धमकीचा पुनरुच्चार केला. या सगळ्या गोष्टी सरकार पक्षाकडे व्हिडिओ आणि ऑडिओ रेकॉर्डिंगच्या स्वरुपात आहेत, अशी माहिती सरकारी वकील ॲड. उज्ज्वल निकम यांनी दिली.

### पुढील सुनावणी १० एप्रिल रोजी

तपास अधिकारी आणि माझे सहकारी ॲड. बाळासाहेब कोल्हे यांनी आरोपींच्या वकिलांना लागणाऱ्या सगळ्या कागदपत्रांची पूर्तता केली. आमच्याकडे असलेल्या उपलब्ध पुराव्यांनुसार ही घटना ८ ऑक्टोबर २०२४ पासून ते ९ डिसेंबर २०२४ संतोष देशमुखांची निर्घृण हत्या होईपर्यंत या घटनेची मालिका न्यायालयात विषद केली. प्रत्येक घटनेच्या तारखेविषयी आमच्याजवळ पुरावा आहे. यातील संघटीत गुन्हेगारी कशी फोफावली गेली? आणि यातील म्होरक्या सुदर्शन घुले हा मुख्य आरोपी वाल्मीक कराड याच्या म्हणण्यानुसार कसा वागत होता, हे देखील न्यायालयात स्पष्ट केले. आरोपींना हवी होती, ती सर्व कागदपत्रे देण्यात आलेली आहे. सुनावणीची पुढील तारीख १० एप्रिल ठेवली आहे. त्यादिवशी आम्ही न्यायालयाने आरोपींवर कोणकोणते गुन्हे करावेत, चार्ज फ्रेम करावा, याबाबतचा विनंती अर्ज देणार आहोत, असे ॲड. उज्ज्वल निकम यांनी सांगितले.

### या प्रकरणातले निघालेले सीडीआर आम्हाला द्या - धनंजय देशमुख

दुसरीकडे या प्रकरणातले निघालेले सीडीआर आम्हाला द्यावेत, अशी मागणी धनंजय देशमुख यांनी केली. या प्रकरणातील सर्व आरोपींना फाशी झाली पाहिजे. मुख्यमंत्र्यांनी सभागृहात या प्रकरणाविषयी बोलले आहेत. यांना लवकरात लवकर फाशीची शिक्षा झाली पाहिजे. गरज पडल्यास आणखी आंदोलन आम्ही करणार, आम्ही कुठेही कमी पडणार नाहीत. गावकरी कुठेच मागे सरकले नाहीत. आज सविस्तर बोलणे झाले तर आम्ही याबाबत वकील साहेबांना बोलणार आहोत किंवा दोन दिवसांनी त्यांची आमची भेट होणार आहे. फास्टट्रॅकवर प्रकरण चालवण्यासाठी आम्ही आग्रही आहोत. या प्रकरणातले निघालेले सीडीआर आम्ही मागणार आहोत, यामध्ये मोठ्या मोठ्या माणसांचे फोन कॉल त्यांच्या अज्ञानात झाले आहेत. अशी मागणी सरपंच संतोष देशमुख यांचे बंधु धनंजय देशमुख यांनी केली आहे.

बीड / प्रतिनिधी

**मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी आज बीड न्यायालयात सुनावणी पार पडली. सरकारी उज्ज्वल निकम कोर्टात युक्तिवाद केला. संपूर्ण घटनेला वाल्मीक कराड याने गाइड केले, असा युक्तिवाद उज्ज्वल निकम यांनी कोर्टासमोर केला आहे. वाल्मीक कराडे या घटनेला गाईड केल्याचे सीडीआरमधून समोर आल्याचेही उज्ज्वल निकम यांनी युक्तिवादादरम्यान म्हटले आहे. आजच्या सुनावणीदरम्यान आरोपींना व्हिसीद्वारे हजर करण्यात आले. दरम्यान, सुनावणी पार पडल्यानंतर ॲड. उज्ज्वल निकम यांनी पत्रकार परिषद घेत सुनावणीबाबत माहिती दिली.**

संतोष देशमुख हत्या प्रकरणात उज्ज्वल निकम यांची सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. आज या प्रकरणाची सुनावणी पार पडली असून या सुनावणीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेले आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात ८ आरोपींना अटक केली असून त्यांच्यावर मकोकाअंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. मात्र, कृष्णा आंधळे हा आरोपी अद्याप पोलिसांना सापडलेला नाही.

### निकमांनी केली तपास अधिकाऱ्यांशी चर्चा

दरम्यान, आता हे प्रकरण आरोप निश्चितीसाठी तयार असल्याचे उज्ज्वल निकम म्हणाले. मात्र कागदपत्रे न मिळाल्याने आरोप निश्चित करण्यात येऊ नये, अशी विनंती आरोपींच्या वकिलांनी केली आहे. याप्रकरणी पुढील सुनावणी १० एप्रिल रोजी होणार आहे.

### आरोपीच्या वकिलांनी कोणत्या कागदपत्रांची मागणी केली?

ज्या कागदपत्रांवर सरकारची भिस्त होती, विशेषत: सीसीटीव्ही फुटेज, त्याचप्रमाणे सीडीआर, आरोपींची ७ डिसेंबर २०२४ रोजी एका हॉटेलमध्ये झाली, त्यासंदर्भातले सर्व कागदपत्रांची मागणी आरोपींच्या वकिलांनी केली होती. आवादा कंपनीच्या अधिकाऱ्याला खंडणीसाठी दिलेल्या धमकीचे ऑडिओ कॉल्सचे रेकॉर्डिंग न्यायालयात दाखल केले आहे.

# महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामात बोगसगिरी

## बीडिओ कांबळे यांची उचलबांगडी करा - सामाजिक कार्यकर्त्यांची मागणी




गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई पंचायत समिती कार्यालयामध्ये सावळा गोंधळ सुरू असून अनेक कमा सह महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामात बोगसगिरी सुरू असून याकडे बीडिओ कांबळे यांचा आर्थिक कानाडोळा होत असल्याने सामान्य जनतेची कामे होत नसल्याने संताप व्यक्त होत आहे, बीडिओ कांबळे या नेत्याची हुजरेगिरी करत सामान्य माणसाला हिन दर्जाची वागणूक देत असून ज्या कामात मलिदा भेटेल त्या कामाला प्राधान्य देत आहेत ही बाब समोर येत असून या गटविकास अधिकारी यांची उचलबांगडी करावी अशी संतप्त प्रतिक्रिया सामान्य जनते सह सामाजिक कार्यकर्त्यांते यांनी व्यक्त केली आहे.

या बाबत सविस्तर असे की,गेवराई पंचायत समिती कार्यालयामध्ये जो आर्थिक देवाण घेवान करेल त्यांची कामे प्राधान्यानी करण्यात येत आहेत परंतु सामान्य जनतेला वेठीस धरण्याचे काम बीडीओ कांबळे या करत असून त्यांची पंचायत समिती गेवराई येथून उचलबांगडी करण्याची मागणी जनतेतून होत आहे. शासनाच्या योजना या सामान्य जनते पर्यंत पोहचणे ही जाबाबदारी शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांची आहे परंतु गेवराई पंचायत समिती मध्ये सामान्य जनतेची अडवणूक करण्यात येत असून नेत्याच्या पुढे जी हुजुरी करण्यात अधिकारी धन्यता मानत असल्याचे चित्र जनतेच्या डोळ्यासमोर दिसत असून तालुक्यातील काम घेवून आलेल्या नागरिकांना अत्यंत खालच्या दर्जाची वागणूक कांबळे या देत असल्याचे दिसून येते,नेते मंडळी आल्यावर त्यांच्या समोर मान हलवून काम करतोय असा देखावा करून लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न यांच्या कडून होत असल्याने असेल अधिकारी जनतेच्या सेवेत नसावेत अशी प्रतिक्रिया लोका कडून एकाव्यास मिळत आहे.याकडे वरिष्ठ अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांनी लक्ष घालावे अशी मागणी सामान्य जनते मधून होत आहे....

१) बदामराव पंडित यांच्या बद्दल गैर विश्वास करण्याच्या प्रयत्न.......

गेवराई तालुक्याचे माजी मंत्री लोकनेते बदामराव पंडित यांनी गेवराई तालुक्यातील सात ग्रामपंचायत मधील कामाचा आढावा आणि संचिका

(उर्वरीत पान २ वर)

## मोटार सायकल चोरी करणा-या दोन चोरांना माजलगाव पोलीसांनी केल जेल बंद




बीड ।प्रतिनिधी

फ़िर्यादी नामे अविनाश मधूकर घनघाव वय २९ वर्षे व्यवसाय नौकरी रा. मोगरा ता. माजलगाव जि. बीड यांची मोटार सायकल दिनांक २७/०३/२०२५ रोजी ०४/०० वाजता दरम्याण पुर्नवादी बँक समोरुन माजलगाव येथुन चोरी गेली होती त्यांचे फिर्यादीवरुन गुन्हा दाखल केला. सदर गुन्ह्याचा तपास करीत असतांना गुप्त बातमीदारांनी माहीती दिली की, आरोपी नामे १) सचिन सुरेश बौत वय-२२ वर्ष व्यवसाय-मजुरी २) रविंद्र सुरेष बौत वय-२६ वर्ष व्यवसाय-मजुरी दोघे रा. साई मंदीर रोड पाथरी ता. पाथरी जि.परभणी ह. मु.जय महेश कारखाना पवारवाडी ता. माजलगाव जि. बीड यांनी चोरली आहे. त्यावरुन सदर आरोपीतांचा शोध घेवुन त्यांना अटक केले. व त्यांनी गुन्हा केल्याचे कबुली दिल्याने त्यांचेकडे अधिक तपास करुन त्यांचेकडुन पुर्णावादी बँक माजलगाव येथुन चोरी केलेल्या ०३ मोटार सायकल व इतर ठिकाणावरुन चोरीस गेलेल्या ०२ मोटार

(उर्वरीत पान २ वर)

## उद्या बीडमध्ये संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत महत्त्व पूर्ण बैठक



बीड ।प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जाज्वल्य इतिहासातून प्रेरणा घेऊन येणारी पिढी चारित्र्य संपन्न व सामर्थ्यशाली बनावी या हेतूने नवीन शैक्षणिक धोरणात छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात यावा या महत्वपूर्ण मागणी सोबतच मराठा समाजातील विद्यार्थ्यांचे व कर्मचाऱ्यांचे प्रश्न सरकार समोर मांडून ते प्रश्न मार्गी लावण्यासाठी उद्या शुक्रवार (ता. २८) रोजी संध्याकाळी सहा वाजता बीड शहरातील आशीर्वाद मंगल कार्यालय येथे मराठा संघर्ष योध्दा

मनोज जरांगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड जिल्ह्यातील शिक्षक, वकील, डॉक्टर इंजिनिअर सर्व कर्मचारी व समाज बांधव संघटनेच्या भव्य बैठकीचे आयोजन केरण्यात आले आहे. मनोज दादा जरांगे यांच्या उपस्थितीत महत्त्वाच्या विषयावर चर्चा

(उर्वरीत पान २ वर)

# बीडच्या बिंदुनामावली मुद्द्यावर मंत्रालयात विशेष बैठक

## नियुक्त्यांमध्ये झालेल्या अनियमिततेची चौकशी करण्यासाठी विभागीय आयुक्तांची समिती



मुंबई ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सर्वच शासकीय विभागांमध्ये अधिकारी आणि आणि कर्मचारी यांची नियुक्ती बिंदुनामावलीनुसार झालेल्या नाहीत. यासंदर्भात मोठ्या प्रमाणात अनियमितता झालेली आहे. यविषयी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि.२६) रोजी मंत्रालयात विशेष बैठक पार पडली. या बैठकीत, बीड जिल्ह्यात झालेल्या शासकीय अधिकारी, कर्मचारी यांच्या नियुक्त्यांमध्ये झालेल्या अनियमिततेची चौकशी करण्यासाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्याचे आदेश ना.अजित पवार यांनी दिले आहेत. याबाबत आ.सुरेश धस, आ.प्रकाश सोळंके, आ.संदीप क्षीरसागर यांनी तक्रारी केल्या होत्या. तसेच विधीमंडळात देखील हा मुद्दा अनेकवेळा उपस्थित केला गेला होता.

शासनाच्या विभागांमध्ये बिंदुनामावलीनुसार पदांची मागणी करून पदभरती करण्यात येते. परंतु पदभरतीनंतर नियुक्ती देताना तसेच बदली व प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी बिंदुनामवलीचा वापर केला जात नाही. त्यामुळे मागील काळात बीड जिल्ह्यामध्ये एका विशिष्ट प्रवर्गाचेच अधिकारी आणि कर्मचारी प्रचंड संख्येत नियुक्त झाले आहेत. त्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात सामाजिक

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)



## संपादकीय

# दु:स्वप्नाचा धडा

समस्त मानवजातीवरील अतिभीषण संकट ठरलेली करोनाची साथ आणि त्यामुळे लागू झालेल्या 'लॉकडाउन'ला पाच वर्षे पूर्ण झाली आहेत.समस्त मानवजातीवरील अतिभीषण संकट ठरलेली करोनाची साथ आणि त्यामुळे लागू झालेल्या 'लॉकडाउन'ला पाच वर्षे पूर्ण झाली आहेत. मागे वळूनही पाहण्याची इच्छा न होणाऱ्या या दोन वर्षांच्या कालखंडाने असंख्य दु:खद आठवणी दिल्या; त्यासोबतच जगण्यासाठी काही मोलाचे धडेही दिले आहेत. त्यामुळेच नव्या जगाशी जुळवून घेताना त्यांचे पुनरावलोकन महत्त्वाचे ठरते. चीनमधून जगभरात पसरलेल्या आणि सूक्ष्मदर्शकाशिवाय न दिसणाऱ्या या विषाणूने जगभरात ७० लाखांहून अधिक बळी घेतले. भारतात साडेचार कोटी नागरिकांना त्याची बाधा झाल्याची आणि सुमारे साडेपाच लाख बळी गेल्याची अधिकृत नोंद आहे, तर महाराष्ट्रात रुग्णसंख्या कोटीच्या घरात आणि बळींची संख्या दीड लाखांवर गेली.

करोनाच्या तीन लाटांपैकी पहिल्या लाटेत सरकार, तज्ज्ञांपासून सर्वसामान्य नागरिकांमध्येही हा आजार आणि लक्षणे-परिणामांबाबत अनामिक भीती आणि प्रचंड अज्ञान होते. याची चाहूल लागताच सरकारने 'लॉकडाउन' लागू केला. यातील निर्बंध काहीसे शिथिल होतानाच आलेल्या दुसऱ्या लाटेत करोनाने अक्राळविक्राळ रूप धारण करून साऱ्या जगालाच विळखा घातला. भारतासह अनेक देशांमध्ये या काळात प्रचंड संख्येने बळी गेले. या दिवसांत निकटवर्तीय जगाचा निरोप घेत असल्याचे दु:ख हजारोंनी अनुभवले. रुग्णालयांत जागा न मिळाल्याने उपचारांअभावी झालेले हाल दिसले; तसेच प्रतिबंधक औषधे आणि ऑक्सिजनच्या टंचाईने भलेभले हतबल झाले. एकीकडे औषधांचा काळाबाजार करणाऱ्यांचा पराकोटीचा स्वार्थ होता; तर दुसरीकडे जीवाची पर्वा न करता रुग्णांवर उपचार करणारे आरोग्यसेवक, पोलिस, स्वच्छतादूत आणि शास्त्रज्ञ अशा वेगवेगळ्या करोनायोद्ध्यांचा बाणाही विसरता येणार नाही.

रोजगाराअभावी पुण्या-मुंबईतून बिहार-उत्तर प्रदेशाकडे पायी निघालेल्या श्रमिकांचे तांडे पाहून हृदये पिळवटून निघाली; त्याच वेळी परिचित-अनोळखी व्यक्तींसाठी जेवणाची सोय करणाऱ्या, कोणी हात लावण्यास तयार नसलेल्या मृतदेहांवर अंत्यसंस्कार करणाऱ्या स्वयंसेवकांच्या माणुसकीने डोळ्यांत पाणी उभे राहिले. या परिस्थितीत काही स्वयंघोषित तज्ज्ञांनी बेजबाबदारपणे 'चिकनद्वारे, वृत्तपत्रांद्वारे करोना पसरतो', 'लशी धोकादायक आहेत' असे तद्दन अवैज्ञानिक तारे तोडले. या रोगाचा भयाकारी फटका बसला, तो जगाच्या अर्थकारणाला. हजारो उद्योग बंद पडले. लाखोंनी रोजगार गमावले. अनेकांचे वेतन निम्म्यावर आले. हातावर पोट असणाऱ्यांपुढे तर जगण्याची भ्रांत निर्माण झाली. सरकारने मोफत धान्य पुरविण्यासह अर्थचक्र सुरू ठेवण्यासाठी काही योजना जाहीर केल्या; मात्र या सवलतींचा 'ओव्हरडोस' झाल्याने काही देश चलनवाढीसारख्या प्रश्नांना तोंड देत आहेत. भारतालाही त्याची झळ बसली असून विषमता आणि विकासाच्या गतीवर झालेले परिणाम आजही कमीअधिक प्रमाणात भोगावे लागत आहेत.

या वैश्विक संकटाने जगभरातील सरकारे, आंतरराष्ट्रीय संस्थांपासून ते सर्वसामान्यांना मिळालेले काही धडे कायमस्वरूपी आचरणासाठी आहेत, याचा संकटातून बाहेर पडल्यावर अनेकांना विसर पडू लागला आहे. त्या काळात कटाक्षाने सुरक्षित वैयक्तिक अंतर राखणारे, सार्वजनिक ठिकाणी मास्क वापरणारे अनेक जण आता निष्काळजीने वागू लागले आहेत. ठिकठिकाणी अस्वच्छता आणि अनारोग्याचे पुनरागमन होताना दिसत आहे. दूषित पाणीपुरवठ्यामुळे पुण्यात आलेल्या 'जीबीएस'सारख्या आजाराच्या फैलावाने यंत्रणांनीही करोनाच्या साथीतून पुरेसे धडे घेतले नसल्याचे स्पष्ट झाले आहे. सार्वजनिक व खासगी रुग्णालयांमध्ये पायाभूत सुविधांबाबतची ओरड कायम आहे, त्याबरोबरच केंद्र आणि राज्य सरकारे आरोग्य व संशोधनावर भरीव तरतूद करण्याऐवजी लोकानुनयी योजनांवरच भर देत आहेत.

## जाहीर प्रगटन

मा. श्री. के. एन. निवडंगे ४थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, केज यांच्या न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १२८ / २०२५

मारुती वि निरंक नि. सी

अर्जदार १. मारुती लक्ष्मण जधव वय ६८ वर्षे, धंदा शेती

रा. पाटील गल्ली, केज ता. केज जि. बीड ह. मु. बाहेगव्हाण ता. वडवणी जि. बीड

निरंक

प्रकरण :- भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार हे मयत नामे लक्ष्मण धोंडीबा जाधव यांचा मुलगा आहे. मयत नामे लक्ष्मण घोडीबा जाधव हे दि. ०९.१२.१९८५ रोजी वयोवृध्द होवुन नैसर्गीकरित्या मयत झाले आहेत. तसेच जनाबाई लक्ष्मण जाधव हया केज ता. केज जि. बीड येथील रहिवाशी असुन त्या वयोवृध्द होवुन नैसर्गीकरित्या दि. २५.०२.२०२५ रोजी मयत झाल्या आहेत. यांना अर्जदार हेच एकमेव वारस असुन अर्जदाराशिवाय मयतास इतर कोणीही जवळचे कायदेशीर वारस नाहीत अर्जदार हेच एकमेव वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी, वरील अर्जदार हे मयत नामे लक्ष्मण धोंडीबा जाधव व मयत नामे जनाबाई लक्ष्मण जाधव रा. पाटील गल्ली केज ता. केज जि. बीड ह. मु बाहेगव्हण ता. वडवणी जि. बीड यांचे वारस आहेत. शासकिय व निमशासकिय कामासाठी अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत नामे लक्ष्मण धोंडीबा जाधव व मयत नामे जनाबाई लक्ष्मण जाधव रा. पाटील गल्ली केज ता. केज जि. बीड ह. मु. बाहेगव्हाण ता. वडवणी जि. बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक २६/०३/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयायचे शिक्कयाने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २८/०४/२०२५ आहे.

**कनिष्ठ लिपीक**
**४ सह दिवाणी न्यायालय,**
**क. स्तर, केज**

**स्वाक्षरित/-**
**सहा.अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,**
**क.स्तर, केज**

# जय भवानीच्या स्पर्धा परीक्षा केंद्राचे यश

## जयभवानीचा विद्यार्थी अशोक बांगर यांची पीएसआय पदी निवड

पाटोदा ।प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालयात ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थ्यांसाठी मोफत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र चालवले जाते.त्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राला यश मिळाले आहे. महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी श्री.अशोक बांगर यांची महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगा मार्फत घेतलेल्या परीक्षेतून पीएसआय पदी निवड झाली आहे. अशोक बांगर यांची पोलिस निरीक्षक पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ.विश्वास कदम सर व प्र.प्राचार्य प्रा.सोमनाथ घाडगे यांच्या शुभहस्ते श्री.अशोक बांगर यांचा शाल,श्रीफळ,व पुष्पगुच्छ देवून महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.या प्रसंगी व्यासपीठावर माजी प्राचार्य डॉ.सुनिल जाधव, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा.विनोद किर्दक व प्रा. डॉ. बंडू लोखंडे यांची उपस्थिती होती.

प्रारंभी प्रा. डॉ शिवाजी काकडे यांनी या सत्कार समारंभाचे प्रस्ताविक केले त्यानंतर सत्काराला उत्तर देताना सत्कार मूर्ती पीएसआय श्री अशोक बांगर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना प्रतिकृती परिस्थितीत कसा अभ्यास केला आहे सांगून आत्मविश्वास निवेदन देह आणि चिकाटीने अभ्यास केल्यास यश मिळते असे विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन



केले. त्यानंतर प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी सांगितले की ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थ्यांसाठी या महाविद्यालयात मोफत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू केले होते. श्री. अशोक बांगर यांची पीएसआय पदी निवड झाली हे या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे पहिले यश आहे. याची विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी ! असे विद्यार्थ्यांना अहवान केले. या कार्यक्रमाचे बहारदार संचलन प्रा. डॉ.अशोक देवगुडे यांनी केले व आभार प्रा.डॉ.बंडू लोखंडे यांनी व्यक्त केले या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व बहुसंख्य

# आष्टी तालुक्यातील १२५ ग्रामपंचयत सरपंचपदांचे आरक्षण जाहिर

आष्टी ।प्रतिनिधी

ग्रामपंचायत सरपंचपद आरक्षण सोडत कार्यक्रम सोमवार दि. २५ मार्च रोजी तहसिलदार वैशाली पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाला. आष्टी तालुक्यातील आगामी ग्रामपंचायत निवडणुकीसाठी सरपंचपदांचे आरक्षण सोडत कार्यक्रम सकाळी ११ वाजता आष्टी तहसिल सभागृहात करण्यात आला. यावेळी सरपंच, उपसरपंच, पदाधिकारी, इच्छुक सरपंच व असंख्य नागरिक उपस्थित होते. महाराष्ट्र शासन ग्रामीण विकास विभाग, बीड जिल्हाधिकारी कार्यालय यांचे निर्देशाप्रमाणे मुंबई ग्रामपंचायत सरपंच व उपसरपंच नियम १९६४ मधील नियम ३ (अ) प्रमाणे आष्टी तालुक्यातील सरपंचाचीपदे वेगवेगळ्या प्रवर्गासाठी तसेच समांतर प्रवर्गासाठी आगामी पाच वर्षाकरिता सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी गठीत होणाऱ्या ग्रामपंचायती करता सरपंचपदांसाठी सोडत पद्धतीने आरक्षण कार्यक्रम झाला.

अनुसुचीत जाती महिला - कासारी, बेलगाव, सुलेमान देवळा, पिंपरी घुमरी, बीडसांगवी, महिंदा, पारोडी. अनुसुचीत जाती - वटणवाडी, पांगुळगव्हाण, बांदखेल, पांढरी, ब्रह्मगाव, डोंगरगण या ग्रामपंचायतींचा समावेश आहे. अनुसुचीत जमाती महिला - शेरी बु.,शेरी खु. अनुसुचीत जमाती - खुंटेफळ वा. नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला - अंभोरा, चिंचपूर, देसुर, देऊळगाव घाट, गहुखेल,

कऱ्हेवडगाव, केरूळ, खरडगव्हाण, खिळद, कुंबेफळ, मोराळा, पाटसरा, पिंपरखेड, सुंबेवाडी, बाळेवाडी, पिंपळगाव घाट, सांगवी पाटण. नागरिकांचा मागास प्रवर्ग- अरणविहिरा, बोरोडी चिंचोली, फत्तेवडगाव, हिंगणी, कऱ्हेवाडी, केळसांगवी, खडकत, किन्ही, मांडवा, पिंपळा, पिंपरी आष्टी, सांगवी आष्टी, वेलतुरी, चिखली, डोईठाण, लमानतांडा (वा). सर्वसाधारण महिला राखीव - कानडी बु., चिंचाळा, तवलवाडी, निमगाव बोडखा, पिंपळगाव दाणी, पोखरी, मातकुळी, कोयाळ, धनगरवाडी (डो.),




धनगरवाडी (पि.), नांदा, शिराळ, हाजीपूर, टाकळसिंग, नागतळा, हनुमंतगाव, हाकेवाडी, आष्टा ह. ना., घोंगडेवाडी, हिवरा, म्हसोबाची वाडी, रुईनालकोल, साबलखेड, सराटेवडगाव, शिरापूर, ठोंबळसांगवी, सावरगाव घाट, उंदरखेल, वाळुंज, पारगाव जो., देवळाली, जळगाव, मंगरूळ, पांगरा, शेडाळा. अनारक्षीत (सर्वसाधारण) ग्रा. पं. - केळ, जामगाव, वाहिरा, सुरुडी, कडा, कानडी खु., कापसी, खुंटेफळ पुंडी, गंगादेवी, दौलावडगाव, निमगाव चोभा, लिंबोडी, टाकळी आमिया, सालेवडगाव, भातोडी, धामणगाव, करंजी, पुंडी, साकत, भाळवणी, दैठणा, धिर्डी, हातोला, मातावळी, नांदूर, पिंपरी घाटा, शेकापूर, बावी, देवीनिमगाव, धानोरा, घाटा पिंपरी, हातोळण, कारखेल बु., कारखेल खु., कोहिनी, लोणी सय्यद मीर, वाघळूज या गावांचे सरपंचपद सर्वसाधारण (अनारक्षीत) आहेत. कडा, जामगाव, लोणी, धानोरा, दौलावडगाव या.मोठ्या गावांचे सरपंचपद खुले आहे तर रुईनालकोल, कोयाळ, आष्टा ह. ना,, सराटेवडगाव, टाकळसिंग या गावांचे सरपंचपद महिलेसाठी राखीव झाले आहे.

# रमजानच्या माध्यमातुन सर्वच जाती धर्मातील लोकांना चांगला संदेश देण्याची आपणाला संधी मिळते - भाई विष्णुपंत घोलप

पाटोदा ।प्रतिनिधी

भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने मंगळवार दि.२५/३/२०२५ रोजी रोजा ईफ्तार पार्टीचे आयोजन दर्गा मज्जिद,राज महमंद चौक ता.पाटोदा येथे करण्यात आले होते त्यावेळी रोजा ईफ्तार पार्टीचे आयोजक शेकापचे जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात रमजान महिना हा मानवाच्या मनातील वाढलेली दरी कमी करण्यासाठी तसेच परस्परामध्ये स्नेह भाव वाढविणारा हा पवित्र महिना असुन या रमजान महिन्यात मानवाला संयम,शांतता, त्यागाची भावना,माणसाचा चांगुलपणा दाखविण्याचा तसेच उपवासाच्या माध्यमातुन संयमाबरोबर आपल्या आत्म्याला शुध्द करण्याचा देखील संदेश रमजानच्या माध्यमातुन मानवाला देण्यात आलेला आहे.रमजानच्या पवित्र महिन्यात आपल्याकडुन झालेल्या चुकीला क्षमा मागण्याचा व इतरावर दया करण्याचा आणि दान धर्म करुन श्रध्देने प्रार्थना करुन अल्लाहाकडे(परमेश्वराकडे) सर्वांसाठी दुवा मागितला जातो.

या रोजा ईफ्तार पार्टीला दलितमित्र एकबाल पेंटर,काँ.महादेव नागरगोजे,शेख सादेक भाई नदाफ, दिलीपराव गाडे, शिवसेना तालुका प्रमुख मुकुंद शिंदे, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष राहुल जाधव, राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते ड.सय्यद वहाब, मराठी पत्रकार संघाचे ता.अध्यक्ष अजय जोशी,शब्बीर पटेल,शेख



जवाद, शम्मु पटेल,शेख इम्रान, अजीज चाऊस, पत्रकार कादर मकराणी,पत्रकार इद्रीस चाऊस, पत्रकार आजीज शेख,जमशेर पटेल,शेख शहानवाज सर, शेख जुनेद, पत्रकार हमीखान पठाण,डॉ.हरिदास शेलार,डॉ.रविंद्र गोरे,सचिन गायकवाड,शेख जावेद,शेख अब्दुल रहेमान, शेख यासीन भाई, संदीप जाधव, रामदास भाकरे, अजिज मकरणी, शिवाजी राख,आबासाहेब भोसले, अजय कांकरिया,शेख महेशर,, विजय जाधव,सय्यद फय्याज, नरहरी पवळ,औरसमल पिंटु,मुकरम पठाण, नासेर भाई, सय्यद भाई मुंबईवाले, पठाण अकबर, ताहेर पठाण, ईस्माईल भाई, सय्यद रहीम, चक्रपाणी जाधव,वसंत काळे, सोपानराव जायभाय,शेख जावेद,फकरूद्दिन भाई, लक्ष्मण घोलप,भिमराव घोलप, बंडु तरटे आणि इतर बहुसंख्या मुस्लिम बांधव उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्र संचलन सय्यद साजेद यांनी केले.

# पुणे जिल्ह्यात एकावर प्राणघातक हल्ला करुन पळून आलेले सात जण केज पोलिसाच्या जाळ्यात

केज/प्रतिनिधी

पुणे जिल्ह्यातील कारेगाव ता.शिरूर घोडनदी येथील एका तरुणांवर धारदार कोयत्याने प्राणघातक हल्ला करून तीन दुचाकी वरून पळून आलेल्या सात संशयित आरोपीना मस्साजोग शिवारातील एका पेट्रोल पंपाजवळ ताब्यात घेतले.याबाबतची सविस्तर माहिती अशी की,रांजणगाव पोलिसांनी वायरलेस वरून केज पोलिसांना या आरोपींची माहीती दिली होती. त्यावरून पोलीसनिरीक्षक वैभव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मस्साजोग शिवारात केज पोलिसांनी सापळा लावून सात जणांना जेरबंद केले आहे.शिवाजीनगर, गंगाखेड जि.परभणी येथील सौरभ श्रीराम राठोड वय १७ वर्षे हा युवक पुणे जिल्ह्यातील कारेगाव ता.शिरूर घोडनदी परिसरात शिक्षणासाठी वास्तव्यास आहे.दि.२३ मार्च रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास सौरभ राठोड यास तु ओंकार देशमुख यास खुन्नस देवुन का बघितलेस ?ओंकार देशमुख कोण आहे? तुला माहित आहे कां? थांब तुला जिवंतच सोडीत नाही असे म्हणत गिरीश कराळे,रोहन बोटे,शंकर करंजकर,ओंकार देशमुख ओम चव्हाण,रोहन गाडे सर्वजण रा.कारेगाव ता. शिरूर घोडनदी व दोन



अनोळखी मित्रांनी कोयत्याने पोटात व पाठी वर वार करीत त्याच्या डोक्यात दगडाने मारून जीवे मारण्याचा प्रयत्न केला.सोडविण्यासाठी गेलेल्या यश राजू धनवटे यास हाताने व लाथा बुक्यांनी मारून दमदाटी केली.सौरभ राठोड याच्या वर सध्या रुग्णालयात उपचार सुरू असून यश धनवटे याच्या फिर्यादी वरून वरील सात जणां सह इतर अनोळखी दोघां विरुद्ध रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला होता.पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे हे तपास करीतहोते.याप्रकरणातील सातही आरोपी हे दुचाकी वरून बीड जिल्ह्यातील केज पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मस्साजोग शिवारात पळून गेल्याचे लोकेशन पोलीसनिरीक्षक महादेव वाघमोडे यांना मिळाले.ही माहिती त्यांनी केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांना भ्रमणध्वनी वरून दिली.पाटील यांनी तात्काळ पोलीस उप निरीक्षक उमेश निकम, फौजदार मांजरगे, जमादार उमेश आघाव, बाळासाहेब अहंकारे यांचे पथक यापरिसरात रवाना केले.या पथकानेसोमवारी सायंकाळी सात वाजण्याच्या दरम्यान या गुन्ह्यातील सात संशयित आरोपीना मस्साजोग शिवारातील एका पेट्रोल पंपाच्या परिसरातून जेरबंद केले असून सातही आरोपीना रांजणगाव पोलिसांच्या ताब्यात देण्यात आल्याची माहिती

## पान १ वरून..

**मोटार सायकल चोरी ...**

सायकल जप्त केले असुन एकुण ०५ मोटार सायकल किंमत अंदाजे २,३०,०००/-रु. मुद्देमाल हस्तगत केला आहे. व अधिक तपास चालु आहे.

सदरची कारवाई मा. नवनीत काँवत पोलीस अधिक्षक बीड, चेतना तीडके अपर पोलीस अधिक्षक आंबाजोगाई, चोरमले साहेब उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग आंबाजोगाई, यांचे मार्गदर्शनाखाली राहुल सुर्यतळ पोलिस निरीक्षक पोलीस ठाणे माजलगाव शहर, पोलीस उपनिरीक्षक केरबा माकणे, पोहवा/१५०८ अनिल भालेराव, पोहवा/१२ गणेश तळेकर, पोशि/२२९९ संतराम थापडे. यांनी केली आहे.

**उद्या बीडमध्ये संघर्ष ...**

होणार या बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. दरम्यान या बैठकीत मनोज जरांगे पाटील काय भूमिका घेतात हे पाहणं सुद्धा महत्त्वाचं ठरणार आहे. या बैठकीस मेळाव्याचे स्वरूप निर्माण होणार आहे. तरी बीड जिल्ह्यातील मराठा समाजाने या मेळाव्यास एक दिवस जातीसाठी या उद्धेशाने समाज बांधवानी मोठ्या प्रमाणात उपस्थितीत राहण्याचे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

**महाराष्ट्र ग्रामीण..**

मागविल्या होत्या त्या पंचायत समिती कार्यालयाकडून उपलब्ध झाल्या नाहीत.. परंतु आलेल्या लोकांचे कामे बंद करून माजी मंत्री बदामराव पंडित यांनी तक्रार दिल्याने काम बंद करण्यात आले असे पंचायत समिती कार्यालय कडून सांगण्यात येत होते ..यावर अनेक गावच्या कार्यकर्त्यांनी बदामराव पंडित आबा यांच्या कडे आमचे गावचे काम करू द्यावे अशी मागणी केली तेव्हा आबा यांनी स्वतः नियमित कामे करण्यास हरकत नसल्याचे सांगितले आणि पंचायत समिती कार्यालयामध्ये येऊन गटविकास अधिकारी यांना नियमानुसार काम करा,सामान्य जनतेची कामे अडवू नका,कार्यालय हे सामान्य जनतेचे असल्याचे सांगितले.यावरून गटविकास अधिकारी आणि

## पान १ वरून..

पंचायत समिती कार्यलयामधील कर्मचारी यांनी आबा बद्दल जो गैर समज निर्माण केला होता तो दूर झाला....

रोजगार हमी योजनेच्या अनेक कामात अनियमितता आणि बोगसगिरी सुरू होती आणि आहे,ज्यांनी काम केले आहे त्यांचे कामे न करता आर्थिक देवाण घेवाण कर्णारांचे कामे केली जातात अशी चर्चा सुरू असून या पंचायत समिती कार्यालयातील भ्रष्ट कारभाराकडे लक्ष देण्याची.मागणी होत आहे.

**बीडच्या बिंदुनामावली ...**

असमतोल निर्माण झाला असून त्याचा परिणाम शासकीय कामकाजावर विपरीत स्वरूपात झालेला आहे. विशेषतः पोलीस विभागातील नियुक्ती आणि आंतरजिल्हा बदलीमध्ये व्ही.जे.एन.टी आणि एन.टी.डी. प्रवर्गातील कर्मचाऱ्यांच्या नियमापेक्षा प्रचंड मोठ्या प्रमाणात अनियमितता झालेली आहे. या सर्व बाबी अत्यंत गंभीर आहेत त्यामुळे बीड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी यासंदर्भात बैठक घेण्याची विनंती महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांच्याकडे केली होती. त्यावर ना.अजित दादा पवार यांनी मंत्रालयात याविषयी विशेष बैठक घेतली. बीड जिल्ह्यातील महसूल, पोलिस, जिल्हा परिषद, शिक्षण विभागात नोकर भरती व बदली करताना मागच्याअनेक वर्षापासून बिंदुनामावलीचे पालन करण्यात आलेले नसल्याने त्याचा फटका खुल्या, ओबीसी, एससी, एसटी प्रवर्गातील उमेदवारांना बसला आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने या प्रकारणाच्या चौकशीसाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित पवार यांनी दिले आहेत. चौकशी समितीच्या अहवालानंतर कारवाई करण्यात येणार आहे. या बैठकीसाठी आ.प्रकाश दादा सोळंके, आ.सुरेश आण्णा धस, शासकीय विभागांचे सचिव, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रशासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# महाराष्ट्रात खाजगी प्लेसमेंट एजन्सींसाठी नवे नियम; विधेयक दोन्ही सभागृहात संमत

मुंबई ।प्रतिनिधी

महाराष्ट्रातील खाजगी प्लेसमेंट एजन्सींवर नियंत्रण आणण्यासाठी आणि युवकांना फसवणुकीपासून संरक्षण मिळावे यासाठी महाराष्ट्र सरकारने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. महाराष्ट्र खाजगी पदयोजन एजन्सी (विनियमन) विधेयक २०२५ हे विधेयक दोन्ही सभागृहांनी संमत केले असून, यामुळे राज्यातील नोकरी शोधणाऱ्या युवकांसाठी अधिक सुरक्षित आणि पारदर्शक प्रणाली तयार होणार आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री श्री. मंगल प्रभात लोढा यांच्या कारकिर्दीत युवकांच्या कौशल्य विकासासाठी, रोजगारासाठी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. विधानपरिषद सदस्यांनी महाराष्ट्र राज्यात रोजगार मेळाव्याची वाढलेली संख्या, त्याचा युवकांना होणार लाभ, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उपलब्ध होत असलेल्या रोजगाराच्या संधी असे सर्व निर्णय दूरदर्शी व मार्गदर्शक ठरणार असल्याचे सांगितले. तसेच महाराष्ट्र खाजगी पदयोजन एजन्सी (विनियमन) विधेयक २०२५ आणण्याचा निर्णय सुद्धा ऐतिहासिक ठरेल असे विधानपरिषद सदस्यांनी नमूद केले. या विधेयकामुळे बनावट भरती प्रक्रियेतून होणारी बेरोजगारांची फसवणूक थांबवण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करून उमेदवारांचे रोजगारात्मक हित जोपासले जाईल.

या विधेयकाबाबत बोलताना मंत्री श्री लोढा म्हणाले, माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीसजी यांनी राज्यात सरकार स्थापन केल्यानंतर प्रत्येक विभागाला १०० दिवसाचा कार्यक्रम तयार करण्यास सांगितले होते. कौशल्य विकास विभागाच्या १०० दिवस कार्यक्रमात सदर विधेयक असावे असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आणि त्यानुसार आम्ही महाराष्ट्र खाजगी पदयोजन एजन्सी (विनियमन) विधेयक २०२५ सादर करत आहोत. या विधेयकामुळे तरुणांच्या हक्कांचे संरक्षण होईल आणि प्लेसमेंट एजन्सीवर सुद्धा अंकुश राहील. आता प्रत्येक प्लेसमेंट एजन्सी सरकारच्या नोंदणीकृत चौकटीत असेल, त्यामुळे पारदर्शकता येईल आणि युवकांचा विश्वासही वाढेल.

राज्यातील युवकांना देशातील आणि परदेशातील रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, पादयोजन संस्थांना सहकार्य करून त्यांचा सहभाग वाढवणे, त्यांच्या कामकाजात पारदर्शकता आणणे तसेच संस्थानाच्या गुणवत्तापूर्वक कामांना प्रोत्साहन देणे हे सदर विधेयकाचे उद्दिष्ट आहे.

विधेयकातील ठळक बाबी

१. या आधी गुमास्ता परवान्याच्या आधारे एजन्सी सुरू करता येत होती, मात्र आता तसे करता येणार नाही. सर्व प्लेसमेंट एजन्सीजना शासनाच्या नोंदणी प्राधिकरणाकडे नोंदणी बंधनकारक असून, वैध नोंदणी प्रमाणपत्राशिवाय कार्य करता येणार नाही. २. चुकीची माहिती, खोटी कागदपत्रे, फसवणूक, माहितीचा दुरुपयोग, नोकरी प्रदान करण्यास निष्फळ ठरणे किंवा नकार देणे, शासनाच्या नावाने लोकांना भटकावणे अशा बाबी समोर आल्यास नोंदणी प्रमाणपत्र रद्द केले जाईल किंवा निलंबित केले जाईल. ३. नोंदणीशिवाय कामकाज करणाऱ्या संस्थांवर दंडात्मक कारवाई किंवा तुरुंगवासाची शिक्षा देण्याची तरतूद देखील या विधेयकात आहेत. ४. सरकारने केवळ नियमनच नाही, तर रोजगार संधी वाढवण्यासाठीही पावले उचलली आहेत. नोंदणीकृत खाजगी प्लेसमेंट एजन्सींसोबत रोजगार मेळावे, करिअर मार्गदर्शन, कौशल्य विकास कार्यशाळा आणि सेमिनार यासारखे अनेक कार्यक्रम कौशल्य विकास विभागाद्वारे भविष्यात घेण्यात येतील. विधेयकामुळे महाराष्ट्रात नोकरी शोधणाऱ्या युवकांना अधिक संरक्षित आणि पारदर्शक प्लेसमेंट सेवा उपलब्ध होणार असून, खाजगी प्लेसमेंट एजन्सीच्या अनियमित कारभारावर नियंत्रण येणार आहे.



## जिजाऊ इंटरनॅशनल स्कूल जाफराबाद येथील शाळेची यशाची परंपरा कायम राखत
## नवोदय विद्यालय परीक्षेत यश

जाफ्राबाद ।प्रतिनिधी

दि.२५ शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ या वर्षांमध्ये घेण्यात आलेल्या जवाहर नवोदय विद्यालय येथील परीक्षेत जिजाऊ इंटरनॅशनल स्कूल जाफराबाद येथील विद्यार्थीनी सायली शशिकांत तारू हिने यशाची परंपरा कायम राखत सन २०२५ च्या प्रवेश परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून तिने जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत घवघवीत यश मिळवून आपल्या शाळेच्या यशाची परंपरा कायम ठेवली आहे.

सदरील विद्यार्थिनीचे शाळेच्या अध्यक्षा माननीय सौ सुरेखाताई संजयजी लहाने यांनी कौतुक करत वर्गशिक्षक के आर घुनावात, मुख्याध्यापक श्री शिंपी सर तसेच सर्व शिक्षकांना शुभेच्छा दिल्या आहेत तसेच तिच्या या यशाने इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळाली आहे.



## मास्टर,पटेल,खुर्शीद आलम, अश्फाकइनामदार, मु.मोहीयोदीन, जैतुल्लाखान,बरकतखान, फेरोज सह सर्व निर्दोष मुक्त

बीड (प्रतिनिधी)

बीड शहरातील बशीरगंज चौकात मुस्लिम समाजातील सामाजिक मुद्द्यावर जन आंदोलन करण्यात आले होते यावेळी बीड शहर पोलिस ठाण्यात पोलिसांनी आंदोलकांवर गुन्हे दाखल केले होते, गेल्या अनेक वर्षांपासून सदर आंदोलकांना कोर्टात चकरा मारावे लागत होते, आज दि.२५-०३-२०२५ रोजी मा. प्रथमवर्ग

न्याय दंडाधिकारी बीड के.सी. बागल मॅडम यांनी पुरावे अभावी आरोपी सैय्यद मोईन मास्टर, सैय्यद फारोक पटेल, खुर्शीद आलम, अश्फाक इनामदार, मुफ्ती मोहीयोदिन, जैतुल्ला खान,बरकत खान, सलीम अध्यक्ष,फेरोज मोमीन,स.नबील उजमा, सैय्यद शकील, मोमीन मुसववीर, इम्रान शिकलगार, काझी निहाल, पठाण कामरान,शेख रफत, शेख मुंतजीब, अहेमद खान, शेख रफत, असीम फारोकी यांची निर्दोष मुक्तता केली आहे, सर्व आरोपी तर्फे ड. शेख सादेक व त्यांचे सहकारी शेख आसेफ यांनी काम पाहिले आहे.

# नितीन रोहोकले यांचा गुणवंत शिक्षक पुरस्काराने गौरव

जालना ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या प्राथमिक विभागाच्या वतीने शैक्षणिक, सामाजिक आणि राष्ट्रीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या उपक्रमशील शिक्षकांचा 'गुणवंत शिक्षक' पुरस्काराने गौरविण्याचा गुणगौरव सोहळा दि २३ मार्च रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या गुणगौरव सोहळ्याचे उदघाटन आ.अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते झाले. यावेळी आ. नारायणभाऊ कुचे, माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर, पंडितराव भुतेकर, विष्णू पाचफुले,महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे संजय पगार, बाबुराव गाडेकर, बाबुराव पवार, भगवान जायभाये, गटशिक्षणाधिकारी रवी जोशी, डॉ.भरत वानखेडे, दत्तात्रय क्षीरसागर, जिल्हाध्यक्ष मंगेश जैवाळ, विकास पोथरे , जगन्नाथ शिंदे , साधनाताई गिऱ्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.या गुणगौरव सोहळ्यात जि. प. प्राथमिक शाळा ढालसखेडा शाळेतील नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणारे तंत्रस्नेही,उपक्रमशील शिक्षक नितीन




रोहोकले यांचा गुणवंत शिक्षक हा पुरस्कार देवून गौरव करण्यात आला. नितीन रोहोकले यांनी डिजिटल शाळा या उपक्रमात प्रा.शा.रवना या शाळेत लोकसहभागातून इंटरक्टिव्ह डिजिटल क्लास सुरू केला. प्रा.शा.भालगाव, किनगाव , रवना या शाळांमध्ये कॉम्पुटर लॅब सुरू केल्या. कॉम्पुटरचा उपयोग फक्त पाठ शिकण्यापुरता मर्यादित न करता विद्यार्थ्यांना शाळेतच चड-उखढ कोर्स शिकवून विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने संगणक साक्षर करण्यासाठी केला. विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययनास मदत व्हावी यासाठी अनेक शैक्षणिक प्स , व्हिडिओंची निर्मिती केली आहे. राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेत आज पर्यंत सरांचा नवोपक्रम जिल्हास्तरावर दोन वेळा प्रथम आला आहे. विद्यार्थ्यांच्या मराठी, गणित , इंग्रजी या विषयातील पायाभूत क्षमता वाढीसाठी जालना एज्युकेशन फाऊंडेशनचा पढो जालना हा उपक्रम अंबड तालुक्यातील शाळेपर्यंत पोहचविण्यासाठी अंबड तालुका समन्वयक म्हणून काम पाहत आहेत.

तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शालेय स्पर्धा परीक्षांची माहिती व्हावी. नवोदय , स्कॉलरशीप परीक्षेची तयारी करता यावी यासाठी शालेय स्पर्धा परीक्षा या यू ट्यूब चॅनलच्या माध्यमातून नियमित ऑनलाईन तासिका सुरू आहेत. महाराष्ट्र राज्यातील अनेक जिल्ह्यांतील विद्यार्थी या तासिकेच्या माध्यमातून शिकत आहेत. इंग्रजी विषयातील विद्यार्थ्यांच्या मनातील भीती कमी करून इंग्रजी विषयाची आवड निर्माण करण्यासाठी मुंबई येथील लिप फॉर वर्ड या संस्थेचा उपक्रम शाळेत राबवित आहे. विद्यार्थ्यांचा सामान्यज्ञान वाढविण्यासाठी मी ज्ञानी होणार, हा उपक्रम सुरू आहे. त्यांचे अनेक विद्यार्थी आज पर्यंत नवोदय , स्कॉलरशीप , भारत टॅलेंट सर्च परीक्षा , मंथन प्रज्ञाशोध , मी ज्ञानी होणार परीक्षां मध्ये यशस्वी होवून त्यांनी राज्यस्तर , जिल्हास्तरावर यश मिळविले आहे. नितीन रोहोकले सर यांनी केलेल्या या कार्याची दखल महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने घेत त्यांना गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मानीत केले. याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे

### स्वतंत्र संचालक विश्वास पाठक लिखीत हंड्रेड डेज फॉर ट्वेंटी फाईव्ह इयर्स या

# ऊर्जा विभागाच्या शंभर दिवसांच्या रिपोर्ट कार्डचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशन

मुंबई ।प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारच्या पहिल्या शंभर दिवसात ऊर्जा विभागाच्या अंतर्गत महावितरण, महानिर्मिती, महापारेषण व महाऊर्जा या कंपन्यांनी केलेल्या कामगिरीच्या प्रगती पुस्तकाचे प्रकाशन सोमवारी (दि.२४मार्च) मा. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईत करण्यात आले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आगामी २५ वर्षांच्या राज्याच्या वाटचालीच्या अनुषंगाने ऊर्जा क्षेत्रातील गरजा पूर्ण करण्याची योजना निश्चित केल्या आहेत. त्यांच्या व्हिजनला अनुसरून पहिल्या शंभर दिवसात वीजविषयक सार्वजनिक कंपन्यांसाठी विविध उद्दीष्टे ठरविण्यात आली होती. त्या उद्दीष्टांची माहिती व ती किती पूर्ण झाली याचा लेखाजोखा देणारे



'हंड्रेड डेज फॉर ट्वेंटी फाईव्ह इयर्स' हे पुस्तक महावितरणचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक यांनी लिहिले आहे.

एमएसईबी होल्डिंग कंपनीच्या संचालक मंडळाच्या बैठकीच्या वेळी पुस्तकाचे प्रकाशन झाले. यावेळी ऊर्जा राज्यमंत्री मा. मेघना साकोरे बोर्डिकर, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, उद्योग सचिव पी. अनबलगन, महापारेषणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक संजीवकुमार, महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी., मुख्यमंत्र्यांच्या सचिव अश्विनी भिडे, एमएसईबी होल्डिंग कंपनीचे वित्त संचालक अनुदीप दिघे, स्वतंत्र संचालक आशिष चंदराणा आणि नीता केळकर उपस्थित होते.

मा. देवेंद्र फडणवीस सरकारच्या पहिल्या शंभर दिवसात महावितरणने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे याचिका दाखल करून वीजदर कमी करण्याचा प्रस्ताव मांडला. आगामी काळातील विजेची गरज पूर्ण करण्यासाठी राज्याचा ऊर्जा परिवर्तन आराखडा तयार करण्यात आला असून त्यामध्ये नवीकरणीय उर्जेवर भर देण्यात आला आहे. त्यामुळे वीजखरेदी खर्चात मोठी कपात होणार असून त्यामुळेच वीजदर कमी करण्याचा प्रस्ताव मांडला आहे.

ऊर्जा विभागाच्या अंतर्गत चारही कंपन्यांना देण्यात आलेली बहुतेक उद्दीष्टे वेळेत पूर्ण करण्यात आली. शेतकऱ्यांच्या हिताच्या मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेत पंप बसविण्याच्या बाबतीत तसेच प्रधान मंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंतर्गत घरगुती ग्राहकांच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्प बसविण्याच्या बाबतीत उद्दीष्टापेक्षा जास्त कामगिरी झाली. विद्युत ग्राहकांना नवीन वीज कनेक्शन देणे, अखंडित वीज पुरवठा करणे, ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करणे, वीज उपकेंद्रांची क्षमता वाढविणे, वीज वितरण जाळ्याची क्षमता वाढविणे, ग्रीन हायड्रोजन प्रकल्प सुरू करणे, सरकारी कार्यालये सौर ऊर्जेवर चालविण्याची योजना अशी अनेक उद्दीष्टे या कंपन्यांना देण्यात आली होती. शंभर दिवसांचा आराखडा पूर्ण करण्यात ऊर्जा विभाग अव्वल ठरला आहे. कामगिरीचे रिपोर्ट कार्ड प्रकाशित करण्याची सुरुवात मा. मुख्यमंत्र्यांच्या ऊर्जा विभागाने स्वतःपासून केली आहे.



## शिवसेना ओबीसी व्हीजे एनटी सेना बीड जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या!

बीड ।प्रतिनिधी

वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या आशीर्वादाने व महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब, खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशावरून तसेच शिवसेना महासचिव संजयजी मोरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना ओबीसी व्हीजे एनटी सेना महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेबजी किसवे साहेब, शिवसेना बीड जिल्हा प्रमुख अनिलदादा जगताप व ओबीसी व्हीजे एनटी सेना महाराष्ट्र राज्य संपर्कप्रमुख किरण चव्हाण यांच्या उपस्थितीत दि. २३ मार्च २०२५ रोजी शिवसेना मुख्यालय बाळासाहेब भवन मुंबई येथे शिवसेना ओबीसी व्हीजे एनटी सेना बीड जिल्हा जिल्हाध्यक्ष पदी मनोज (राजाभाऊ) चव्हाण, जिल्हा संघटक पदी दगडू दादा गायकवाड तर जिल्हा कार्याध्यक्षपदी डॉ. केशवदास वैष्णव महाराज यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदीर्घ अनुभव, दांडगा जनसंपर्क व जनतेप्रती सदैव सेवाभाव असणारे महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी तर बीड शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांना बीड जिल्ह्यात पक्ष संघटन बांधणीसाठी भरभक्कम साथ देण्याकरिता नवनियुक्त

पदाधिकाऱ्यांनी समर्पकपणे काम करून समाजातील तळागाळातल्या वंचित, पीडित, शोषित घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न कराल अशी सदिच्छा देत महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेबजी किसवे साहेब तथा या कार्यक्रमास उपस्थित सर्व शिवसेना पदाधिकाऱ्यांनी नव नियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# अध्ययन अध्यापन टाळून अडीच वर्षापासून मुख्याध्यापक करतात जिल्ह्याच्या कार्यालयात काम

### दोषीविरूद्ध कारवाईची मागणी; जिल्हा परिषदेचा अजब कारभार

बीड ।प्रतिनिधी

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायदा २००९ चा भंग शिक्षण विभागाने केला आहे. जून २०२३ पासून बीड तालुक्यातील ताडसोन्ना शाळेचे वादग्रस्त मुख्याध्यापक खतीब सय्यद यांना बीड येथील शिक्षणाधिकारी (योजना) कार्यालयात नियम डावलून प्रतिनियुक्तीवर घेण्यात आल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे.

या संदर्भात माहिती अशी की, बीड येथील निरंतर शिक्षणाधिकारी कार्यालयाचे शिक्षणाधिकारी (योजना) कार्यालयात रूपांतर झाल्यानंतर शिक्षण विभागाच्या विद्यार्थी लाभाच्या विविध योजना या शिक्षणाधिकारी (योजना) कार्यालयाच्या अंतर्गत कार्यान्वित झाल्या आहेत. सदर कार्यालयाला कर्मचारी देणे, हे बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली आहे. जिल्हा परिषदेमध्ये अनेक कर्मचारी आणि अधिकारी कार्यरत आहेत. यातील कर्मचारी या विभागाला देण्याऐवजी चक्क बीड तालुक्यातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, ताडसोन्ना येथील वादग्रस्त मुख्याध्यापक सय्यद खतीब यांना देण्यात आले आहे. सय्यद खतीब यांच्या विषयी अनेक गंभीर तक्रारी असून त्यांची चौकशी सुरू आहे. शाळेचे काम टाळून जिल्हा कार्यालयात वजन वापरून सय्यद खतीब यांनी आपली नियुक्ती जून २००३ पासून करून घेतली. सय्यद खतीब एम.झेड. या माध्यमिक शिक्षकांची अन्य ठिकाणी रिक्तपदे असलेल्या शाळेवर नियुक्ती करण्यात यावी, अशीही अनेकदा मागणी झाली. परंतु जाणीवपूर्वक याकडे दुर्लक्ष करण्यात आले. जिल्हा परिषद मध्ये लिपिक, वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, सहाय्यक प्रशासन अधिकारी आदी पदे असताना नेमके शिक्षकाचीच त्या कार्यालयात का आणि कशामुळे नियुक्ती केली? याचे कोडे उलगडलेले नाही. सदर प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

नियम डावलून बेकायदेशीर नियुक्त्या

जिल्हा परिषदेत बहुतांशी कामे नियमाला फाटा देऊन होतांना दिसतात. जिल्हा परिषदेच्या कारभार खूप मोठा असल्याने प्रत्यक्ष जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सगळ्याच नियमाकडे आणि कामाकडे , शेलक्ष देणे होत नाही. मात्र संबंधित विभागातील अधिकारी आणि विभाग प्रमुख यांनी नियमानुसार काम करण्यापेक्षा स्वतःचे हात ओले करून मिलीभगत पद्धतीने कारभार होत सुरू आहे. अनेक प्रकरणात नियम लावले जातात तसाच प्रकारही सदर नियुक्तीत झालेला आहे.


## लातूर व्यापारी धर्मशाळा करणार २५ मोफत

# तिरळेपणा, मोतीबिंदू आणि डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी मिरागी नेत्रालयाला आर्थिक सहकार्य

नँबचे अध्यक्ष डॉ. विजय राठी


लातूर ।प्रतिनिधी

व्यापारी धर्मशाळाद्वारा मिरागि नेत्रालयाला २५ तिरळेपणा, मोतीबिंदू व डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी आर्थिक सहकार्य करणार असल्याची माहिती नँब, लातूरचे अध्यक्ष डॉ. विजय राठी यांनी दिली आहे. लातूर व्यापारी धर्मशाळाद्वारा सामाजिक बांधिलकी म्हणून काही कार्यक्षेत्रातील सेवाभावी संस्थांना आर्थिक सहकार्य करण्याच्या भावनेतून नँब संचलित मिरागी नेत्रालयासाठी आर्थिक सहकार्य करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला आहे. मिरागी नेत्रालय ही संस्था डोळ्यांच्या सर्व उपचारासाठी अविरत सेवा करीत आहे. अनेक मोफत शिबिर व शस्त्रक्रिया मिरागीने केल्या आहेत. खासकरून मुलांचे तिरळेपणाचे ऑपरेशन, मोतीबिंदू व अनेक डोळ्याच्या शस्त्रक्रिया एक तर मोफत किंवा अतिशय अल्प दरात केल्या जातात. या सर्वांची दखल घेऊन लातूर व्यापारी धर्मशाळा ह्या संस्थेने संस्थेस २५ ऑपरेशन करण्यासाठी आर्थिक सहकार्य करण्याचे मान्य केले आहे.



याचा लाभ घेण्यासाठी आधार कार्ड, पॅन कार्ड, फोटो व दारिद्र्यरेषेखालील सर्टिफिकेट असणे गरजेचे आहे. ही योजना फक्त ऑपरेशनसाठी असेल. बाकी खर्च पेशंटला करावा लागेल. या योजनेसाठी ०१ एप्रिल २०२५ पासून नोंदणी करून तपासून घ्यावे. मीरागी नेत्रालय हे गीतांजली मार्केट, लातूर येथे आहे. तपासणीसाठी वेळ सकाळी १० ते संध्याकाळी ०६ वाजेपर्यंत आहे. सर्व पेशंटनी सर्व कागदपत्रे सोबत घेऊन येणे आवश्यक आहे.

या सहकार्यासाठी अरविंद सोनवणे, लक्ष्मीरमण लाहोटी, रमेश राठी, दिनेश इनानी, हेमंत बोरा, ललित शहा, रमेश बियाणी आणि ईश्वरप्रसाद डागा आदींचे मोलाचे मार्गदर्शन मिळत आहे त्याबद्दल नँबचे अध्यक्ष डॉ. विजय राठी यांनी समाधान व्यक्त केले आहे.



**बीड – सोमेश्वर मंदिर येथे स्वप्निल प्रकाश राऊत व वैद्य यांच्या शुभमंगल प्रसंगी वधूवरांना शुभेच्छा देताना भारतीय जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष नवनाथ आण्णा शिराळे पाटील,भाजपाचे बीड विधानसभा विस्तारक शांतिनाथ डोरले, काळेगाव हवेलीचे सरपंच भरतराव कानडे भाजपा शक्ती केंद्रप्रमुख शामराव राऊत, दत्ता बापू पवार बापूराव येळे महेंद्र राऊत यांच्या सह मान्यवर.**



## प्रसिद्ध विधीज्ञ अॅड.उज्वल निकम यांची ऑलिव रेस्टॉरंट आणि रिजेन फिटनेस येथे सदिच्छा भेट

बीड(प्रतिनिधी)

बहुचर्चित खटल्यांमध्ये महत्त्वाची कामगिरी करत तसेच दहशतवादी अजमल कसाब विरुद्ध खटल्यात सरकारी वकील म्हणून महत्वाची कामगिरी बजावणारे प्रसिद्ध विधीज्ञ ड.उज्वल निकम यांनी येथील नगर नाका परिसरात असलेल्या ऑलिव रेस्टॉरंट आणि रिजेन फिटनेस येथे सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी त्यांच्या समवेत येथील प्रसिद्ध वकील ड.बाळासाहेब कोल्हे यांची उपस्थिती होती. यावेळी दोन्ही जेष्ठ विधीज्ञ यांचा सत्कार इंजिनीयर राजेंद्र भोपळे, इंजिनीयर प्रतीक भोपळे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी ऑलिव रेस्टॉरंटचे मॅनेजर संजय धुरंधरे, रिजेन फिटनेसचे मॅनेजर पंकज तावरे यांच्या समवेत मित्र परिवार आणि येथील कर्मचारी उपस्थित होते.



## हाजी अ .र गुलाम रसुल उर्दु हायस्कूल येथे सनद वाटप

घनसावंगी ।प्रतिनिधी

हाजी अ .र गुलाम रसुल उर्दु हायसकुल घनसावंगी येथे २०२४ मार्च दहावी मध्ये परिक्षेस उत्तीर्ण झालले विद्यार्थी यांना सनद वाटप करण्यात आली. यावेळी शाळेचे मुख्यध्यापक गुलाम रब्बानी सर व सह शिक्षक अब्दुल कुदुस विद्यार्थी झैद शेख फाईज शेख उपस्थित होते.

# सावता परिषदेची प्रदेश कार्यकारिणी जाहिर

प्रतिनिधी


प्रत्येक तीन वर्षाला फेररचना करण्याच्या सावता परिषदेच्या संघटनात्मक धोरणाला अनुसरुन संस्थापक अध्यक्ष मा. श्री. कल्याणराव आखाडे साहेब यांच्या मार्गदर्शनानूसार व सावता परिषदेचे महाराष्ट्र प्रभारी श्री. मयुरजी वैद्य तसेच प्रदेश कार्याध्यक्ष श्री.संतोषजी राजगुरु व श्री. पांडूंगजी कोठाळे, युवा प्रदेशाध्यक्ष इंजि. प्रविणजी गाडेकर यांच्या सहकार्याने पुढील तीन वर्षांसाठी प्रदेशाध्यक्ष या नात्याने पुढील प्रमाणे प्रदेश कार्यकारणी जाहिर करीत आहे. आगामी तीन वर्षाच्या काळात सावता परिषदेच्या कार्यात सर्वजन झोकून देऊन सहकार्य करतील या अपेक्षेसह नवनियुक्त सर्व प्रदेश पदाधिकारी यांचे हार्दिक अभिनंदन ! पुढील कार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा । प्रधान महासचिव - डॉ. राजीव काळे (बीड) प्रदेश उपाध्यक्ष श्री. महादेव ताटे (माळशिरस, सोलापूर) श्री. भास्कर गाढवे (घनसावंगी, जालना) इंजि. शिवानंद झोरे (छत्रपती संभाजीनगर) श्री. बापूराव धोंडे (कर्जत, अहिल्यानगर) श्री. गोरखनाथ राऊत (नांदेड) श्री. संतोष भाकरे (उमरगा, धाराशिव) श्री. आकाश वाघमारे (अमरावती) प्रदेश महासचिव श्री. शरद माने (मुंबई) श्री. प्रविण वाघमारे (अकोला) श्री. मृदूल माळी (माढा, सोलापूर) श्री. विजय शेंडे (श्रीगोंदा, अहिल्यानगर) श्री. जयसिंग लोखंडे (कोरेगाव, सातारा) ऍड.विष्णुपंत आडत (कोल्हापूर) श्री. राहुल जावळे (नेवासा, अहिल्यानगर) मुख्य प्रदेश संघटक : - श्री. शिवाजी येवारे (परांडा, धाराशिव) प्रदेश संघटक श्री. कृष्णा कटारे (परभणी) श्री.श्रीकांत महाराज माळी (कुरुंदवाड, कोल्हापूर) श्री. दिलीप माळी (धुळे) - सौ. साधना राऊत (पंढरपूर, सोलापूर) श्री. सुदाम लोंढे (पारनेर, अहिल्यानगर) श्री. संजय सागर (विटा, सांगली) श्री. विठ्ठल गाभणे (कळमनोरी, हिंगोली) प्रदेश प्रवक्ते . ऍड.गोपाळ बुरबुरे (लातूर) सहप्रवक्ते प्रा.नाना आमले (अमरावती) खजिनदार श्री. पारस परमार (मुंबई) महिला आघाडी प्रदेशाध्यक्षा - सौ. मनिषा सोनमाळी (अहिल्यानगर) प्रदेश कार्याध्यक्षा सौ. संगिता खुणे (मुंबई) सोशल मिडिया प्रभारी : - श्री. ज्ञानेश्वर भोपळे (छत्रपती संभाजीनगर) राज्याच्या विविध भागातून आणखी काही नविन चेहऱ्यांना पुढील काळात टप्याटप्याने प्रदेश कार्यकारणीमध्ये स्थान देण्यात येईल तसेच लवकरच सर्व जिल्ह्यांचे जिल्हाध्यक्ष, महिला आघाडी व युवा आघाडी जिल्हाध्यक्ष

## संत वामनभाऊ महाराज स्वनपूर्ती

# अखंड हरिनाम सप्तहास दि 3 एप्रिल पासून मोहटे येथे प्रारभ १० एप्रिल रोजी सांगता

मानूर / शाहेबाज पठाण

श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या मोहटादेवी नवसपूर्ती प्रित्यर्थ व जयंती निमित्त मोहटे येथे दिनांक ३ एप्रिल ते १० एप्रिल रोजी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले असल्याची माहिती संयोजक कमिटी व ग्रामस्थांनी दिली आहे पाथर्डी तालुक्यातील मोहटे येथे गहिनीनाथ गडाचे महंत विठ्ठल महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा सप्ताह साजरा होत आहे. प्रारंभ गुरुवार दि. ३ एप्रिल २०२५ पासुन सुरू होणार असून गुरुवार दि. १०एप्रिल २०२५ रोजी सांगता होणार आहे




कार्यक्रमाचे आयोजन महंत श्री ह.भ.प. विठ्ठल महाराज श्री क्षेत्र गहिनीनाथ गड (चिंचोली) यांच्या मार्गदर्शनाखाली केलेले आहे. सर्व धर्मानुरागी, धर्मप्रेमी व ह.भ.प. मंडळींना श्री क्षेत्र गहिनीनाथ गड, व ग्रामस्थ मोहटे ग्रामस्थांच्या वतीने नियोजन हाती घेतले आहे सप्तहात दैनंदिन पहाटे ४ ते ५.४५ काकडा भजन स. ६ ते ७.०० विष्णू सहस्त्रनाम ९ ते १२ गाथा भजन १२.३० ते २ भोजन दु.२ ते ५ श्रीराम कथा सायं. ५ ते ६.०० हरिपाठ सायं. ६.४५ ते ८.४५ भोजन हरिकिर्तन रात्री ९ ते ११ ते ४ हरिजागर संपन्न होणार आहे तर श्रीराम कथा १००८ महामंडलेश्वर स्वामी उत्तमसिंहजी महाराज यांच्या वाणीतून दुपारी २ ते ५ श्रीरामकथा संपन्न होणार आहे तर किर्तन सेवा पुढीप्रमाणे गुरुवार दि. ३ एप्रिल रोजी ह.भ.प.श्री. विष्णु महाराज केंद्रे, आळंदी,शुकवार दि. ४ रोजी, ह.भ.प.श्री. आसाराम महाराज बडे, आळंदी शनिवार दि. ५ रोजी वेदांताचार्य राम महाराज शास्त्री, आळंदी, रविवार दि. ६ रोजी ह.भ.प.श्री. दयानंद महाराज कोरेगाव (दु.१० ते १२ रामजन्माचे किर्तन) तर सायंकाळी ह.भ.प.श्री. अर्जुन महाराज लाड, होळ,सोमवार दि. ७ रोजी ह.भ.प.श्री. उद्धव महाराज चोले, खडकी,मंगळवार दि. ८ रोजी ह.भ.प. रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर, विदर्भ भुषण,बुधवार दि. ९ रोजी ह.भ.प. प्रभाकर दादा बोधले, पंढरपूर, गुरुवार दि. १० एप्रिल रोजी महंत श्री. ह.भ.प. विठ्ठल महाराज संस्थान, श्री क्षेत्र गहिनीनाथ गडकर यांचे दु. ११ ते १ वाजेपर्यंत काल्याचे किर्तन होईल संपन्न होणार आहे त्यानंतर महाप्रसाद वाटप कार्यक्रम संपन्न होणार आहे महंत श्री ह.भ.प. विठ्ठल महाराज श्री क्षेत्र गहिनीनाथ गड, चिंचोली कुशल मार्गदर्शनाखाली व मोहटे ग्रामस्थांच्या सहकार्याने हा नवस्पूर्ती भव्य दिव्य सप्ताह संपन्न होत या कार्यक्रमात श्री क्षेत्र गहिनीनाथ गडाचे सर्व श्री ह.भ.प. टाळकरी व मृदंगाचार्य यांची उपस्थिती असेल व महाराष्ट्रातील सुप्रसिध्द गायक व वादक भाविकभक्त तसेच राजकीय मंडळी आपली मोलाची उपस्थिती लावणार आहेत ग्रामस्थांची हा सप्ताह यशस्वी करण्यासाठी जय्यत तयारी सुरू केली आहे



**घनसावंगी ।प्रतिनिधी**

**८ मार्च महिला दिनाचे औचित्य साधत संरक्षण अधिकारी कार्यालय घनसावंगी मार्फत कौटुंबिक हिंसाचार कायदा याबाबत महिलांना जनजागृती व्हावी हा व्यापक उद्देश समोर ठेऊन सदर चा कार्यक्रम आयोजित केला होता या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे ड टी एस गव्हाणे संरक्षण अधिकारी गोरे सर एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी श्री डाबेराव सर उपस्थिती होते या कार्यक्रमास ड गव्हाणे याने महिलांना कायद्याने सन्मानाने जगता यावे त्यांना कायदाचा आधार मिळुन त्याचे जगणे सन्मानजनक व्हावे यासाठी २६ ऑक्टोंबर २००५ रोजी विधिमंडळाने कौटुंबिक हिंसाचार कायदा पास करून महिलांना कायदेशीर संरक्षण मिळाले या कायदाने महिलांना कलम १८,२०,२१,२२ नुसार संरक्षण,आर्थिक मदत, निवारा मदत मुलाचा ताबा अशा विविध प्रकारचे सहाय्य या कायद्याने प्राप्त झाले असे अंगणवाडी सेविका व पर्यवेक्षक महिलांना संबोधित करताना केले पुढे संबोधित करताना मानवी कुरर्ता याची व्याख्या व उपाययोजना या संदर्भात नात्यांमधील संवाद हा एकमेव हिंसाचारला नियंत्रणात आणु शकतो अशा विश्वास ड गव्हाणे यांनी दर्शिवला सर्व उपस्थित मान्यवरांच्या दृष्टीने हा कार्यक्रम यशस्वी झाला..**

## दिल्ली येथे आरोग्य आणि कल्याण शिक्षण कार्यक्रमासाठी प्रमुख प्रवक्ते म्हणून प्रा.अभिलाष के.के.यांना नामांकन

कडा ।प्रतिनिधी

कडा येथील वर्धमान महावीर चॅरिटेबल ट्रस्ट संचलीत महावीर इंग्लिश स्कूल या सी. बी. एस. ई बोर्ड मान्यताप्राप्त शाळेचे प्राचार्य श्री. अभिलाष के. के.यांना युनेस्कोच्या आरोग्य आणि कल्याणाच्या शिक्षण कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून नामांकित करण्यात आलेले आहे. हा कार्यक्रम २१जुलै ते २५ जुलै २०२५पर्यंत सी.आय.ई.टी.विभाग, एन.सी.ई आर. टी.नवी दिल्ली येथे युनेस्को एन.सी. इ. आर. टी.आणि सी.बी.एस.ई. बोर्ड यांच्यामार्फत आयोजित केला जाणार आहे. या कार्यक्रमामध्ये युनेस्को, पॅरिसच्या प्रतिनिधी सोबत भारताचे शिक्षण जगातील विकसित राष्ट्राच्या बरोबरीने करण्यासाठी, शाश्वत विकास ध्येय साध्य करण्यासाठी भारत देशाने काय उपाययोजना केल्या आहेत हे स्पष्ट करतील.वेगवेगळ्या ५० प्रतिनिधीपैकी १० प्रतिनिधी सी.बी.एस.ई.बोर्डचे असतील त्यामध्ये महावीर इंग्लिश स्कूल चे प्राचार्य अभिलाष के.के. हे सी.बी.एस. ई.सी.ओ.ई. पुणे यांचे प्रतिनिधित्व करणार आहेत. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष- श्री.अमितजी राठोड, उपाध्यक्ष - श्री.संदिपजी चानोदिया , सचिव- श्री.हेमंतजी मेहेर, कोषाध्यक्ष - डॉ. प्रमोदजी भळगट, तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी श्री.मनिषजी गांधी, श्री. प्रकाशजी श्रीश्रीमाळ, श्री.अमोलजी पटवा, श्री. संजयजी पितळे, श्री संतोषजी गांधी,सल्लागार श्री मेहेर सर आणि सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस सरांना शुभेच्छा दिल्या.

# जीएसटी अभय योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

व्याज व दंड माफीसाठी असलेल्या अभय योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कर देयके (निव्वळ कराचे पैसे भरण्याची) शेवटची तारीख ३१ मार्च २०२५ आहे, तर या अभय योजने अंतर्गत अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ३० जुन, २०२५ आहे. करदत्यांनी योजनेचा लाभ घेण्यासाठी पोर्टलवर अर्ज सादर करण्याचे आवाहन वस्तू व सेवाकर विभागातर्फे करण्यात आले आहे. याबाबत मदतीसाठी संबंधित क्षेत्रीय जीएसटी अधिकाऱ्यांशी संपर्क करण्याचे आवाहन राज्यकर सहआयुक्त अभिजित राऊत यांनी केले आहे.

केंद्र सरकारने केंद्रीय अर्थसंकल्प २०२४ मध्ये केंद्रीय वस्तू व सेवा कर कायदा २०१७ अभय योजना जाहीर केली आहे. प्रलंबित वस्तू व सेवा कर विवादांचे निराकरण सुलभ करण्यासोबतच २०१७-१८, २०१८-१९ आणि २०१९-२० या आर्थिक वर्षाशी संबंधित जीएसटी कायद्याच्या कलम ७३ अंतर्गत जारी केलेल्या मागण्यांबाबत करदात्यांवर भार कमी करणे हा योजनेचा उद्देश आहे. या योजनेमुळे करदात्यांना योजनेच्या अटी आणि शर्तींच्या अधीन राहून केवळ मूळ कर रक्कम भरून त्यांचा थकित करांतील व्याज व दंड यांची माफी होऊन करदेयता चुकवता येणार आहे.

या व्यतिरिक्त ज्या प्रकरणांमध्ये सुरूवातीला कलम ७४ अंतर्गत २०१७-१८, २०१८-१९ आणि २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी नोटीस किंवा आदेश जारी करण्यात आला होता आणि कलम ७३ अंतर्गत अपील प्राधिकरण किंवा अपीलीय न्यायाधिकरण किंवा न्यायालयाच्या निर्देशानुसार योग्य आदेश दिला आहे किंवा तो पारित करणे आवश्यक आहे, त्या प्रकरणांमध्ये व्याज आणि दंड माफ करण्याच्या उद्देशाने कलम १२८ अ अंतर्गत समाविष्ट आहे.

पैसे भरण्याची व अर्ज दाखल करण्याची तारीख एकच असल्याचा करदात्यांमध्ये गैरसमज निर्माण झाला असल्याचे दिसून आले आहे. व्याज व दंड माफीसाठी असलेल्या अभय योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेली कर देयके (निव्वळ कराचे पैसे भरण्याची) शेवटची तारीख ३१ मार्च, २०२५ आहे, तर या अभय योजने अंतर्गत अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ३० जुन, २०२५ आहे. करदत्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी पोर्टलवर अर्ज सादर करण्याचे आवाहन वस्तू व सेवाकर विभागातर्फे करण्यात

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

### बोगस मस्टर भरून गटविकास आधिकारी श्री बागलाणे यांची डि ए सी वापरून शासनाच्या निधीची लुट होत आसल्याने

# पालक तांत्रिक अधिकाऱ्याला व इतर दोषीवर बडतर्फ करण्याची मागणी

बीड ।प्रतिनिधी

आष्टी पंचायत समितीचे मनरेगाचे पालक तांत्रिक अधिकारी अमोल राख हे काम न करता बोगस मास्टर भरून घेतात. बोगस मास्टरमुळे शासकीय निधीची लूट सुरू आहे. सदर गंभीर प्रकरणी संबंधिताविरुद्ध कारवाई करून सेवेतून बडतर्फ करावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते राम सूर्यभान खाडे आणि हरिभाऊ सुभाष सांगळे रा. कर्हेवाडी तालुका आष्टी यांनी एका निवेदनाद्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आष्टी तालुक्यात मार्च २०२५ अखेर मनरेगा ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत काम न करता ऑनलाइन बोगस मस्टर भरणे सुरू आहे. शासनाच्या निधीची लूट करण्याचा युद्धपातळीवर प्रक्रिया सुरू आहे. आष्टी पंचायत समितीच्या मनरेगा विभागाचे पालक तांत्रिक अधिकारी अमोल राख हे कार्यरत असून मौजे करेवाडी, तालुका आष्टी येथील रस्त्याच्या कामावर ऑनलाईन बोगस मस्टर भरण्याचे काम सुरू आहे. वास्तविक गावात कोणते काम सुरू नाही. मजूरच नाही, त्यामुळे काम करण्याचा प्रश्नच येत नाही. सदर प्रकरणी निवेदना सोबत पुरावे जोडण्यात आले आहेत. पानसेवस्ती, सानपवस्ती या आनंद रस्त्याचे काम यापूर्वीच लोकसभागातून करण्यात आले. याच कामावर बोगस बिल उचलण्याचा प्रयत्न सुरू आहे. संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने यापुढे शाळेचे संरक्षण भिंतीचे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंतर्गत कामाच्या तक्रारीच्या अनुषंगाने सेवासमाप्तीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. कोणतेही काम ऑनलाईन करू नये, मस्टर भरण्यात येऊ नये असे नमुद करून 'आपले काहीच होत नाही, त्यामुळे ते काहीही करण्यास भीत नाहीत' सदरच्या कामाचे मस्टर भरले जातात. याची कल्पना ग्राम रोजगार सेवक यांनाही नाही. त्यामुळे संबंधितावर तात्काळ कार्यवाही करून सेवा समाप्तीचे आदेश देण्यात यावीत, अशी विनंती राम सूर्यभान खाडे आणि हरिभाऊ सुभाष सांगळे यांनी केले आहे.

निवेदनाच्या प्रति विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर,

## डॉ. देवेश भैय्या पाथ्रीकर यांना राज्यस्तरीय आरोग्य रत्न पुरस्कार

बदनापूर ।प्रतिनिधी

संजीवनी फाउंडेशन महाराष्ट्र राज्य आयोजित छत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२५ विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कर्तबगार व्यक्तीचा मानाचा समजला जाणारा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरव



करण्यात येतो. आरोग्य क्षेत्रात विशेष बदनापूर तालुक्यातील प्रत्येक खेड्यात मोतीबिंदू मुक्त करण्यासाठी निर्मळ क्रीडा व समाज प्रबोधन ट्रस्टचे अध्यक्ष डॉक्टर देवेश भैय्या पात्रीकर हे करत असलेल्या कार्याबद्दल त्यांना राज्यस्तरीय आरोग्य रत्न पुरस्कार जाहीर झाला आहे हा पुरस्कार शनिवारी २९ मार्च रोजी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नाट्यमंदिर सिन्नर तालुका सिन्नर जिल्हा नाशिक येथे विधान परिषदेचे विद्यमान सभापती नामदार प्राध्यापक राम शिंदे व इतर मान्यवराच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहे.

### जिल्हा न्यायालय इमारतीत पक्षकार व वकीलांना मुलभूत सुविधा देण्याची बीड जिल्हा वकील संघाची

# मुख्य न्यायमूर्ती ,मुंबई यांना निवेदनाद्वारे मागणी

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हा न्यायालयाची सुसज्ज इमारत सन २०१६ मध्ये उभारण्यात आली आहे. परंतु त्या ठिकाणी वकील व पक्षकारांना आवश्यक त्या सुविधा अद्याप ही मिळत नाहीत. अगदी पिण्याच्या पाण्यासाठी बसवलेले फिल्टर कायमस्वरूपी बंद आहेत. ईमारती मध्ये कोणत्याही नळाला, शौचालयात पाणी येत नाही.दुर्गंधी पसरली आहे. कोर्टाचे आवारात फक्त एक पाण्याची टाकी आहे,ती पाणी नसल्याने बंद असते. शौचालयात पाणी नसल्याने वकीलांना कामे सोडून घरी जावे लागते.पाणी टंचाई कायमस्वरूपी दुर व्हावी म्हणुन वकील संघाने आ. संदीप क्षीरसागर यांना न्यायालयाच्या आवारात बोअरवेल आणि मोठ्या क्षमतेचे वॉटर फि ल्टर, त्यासाठी लागणारा चबुतरा व शेडसाठी निधी देण्याची मागणी सप्टेंबर २०२४ मध्ये केली असता त्यांनी मंजूर केली परंतु अद्यापपर्यंत न्यायीक प्रशासनाने जागा दिलेली नसल्याने पाणी प्रश्न कायम आहे. सध्या न्यायालयीन इमारतीमध्ये पाणी उपलब्ध नसल्याने वकील सदस्य पाणी विकत घेत आहेत. याबरोबरच न्यायालयाच्या इमारतीमध्ये सर्व सदस्यांची बैठक व्यवस्था झालेली नाही. न्यायालय इमारत व आवारात वकीलांच्या वाहनांच्या पार्किंगसाठी जागा देण्यात आलेली नाही. वकील संघास कार्यक्रम घेण्यासाठी न्यायालयीन इमारतीमध्ये तळमजल्यात एक हॉल देण्यात आलेला आहे. त्या ठिकाणी आवाजाचा प्रॉब्लेम येत असल्याने वकील संघास कार्यक्रम घेण्यासाठी पर्यायी जागा उपलब्ध नाही. कार्यक्रमासाठी प्रतिबंध केल्याने बीड जिल्हा न्यायालयीन इमारत व आवारात कोणताही कार्यक्रम घेता येत नाही. अशा प्रकारे न्याय संस्थेने वकीलांना पूर्णतः दुर्लक्षित केल्याचे दिसून येत आहे.

या सर्व मागणींचा विचार करुन जिल्हा न्यायालयीन इमारत व आवारात मुलभुत सुविधा एका आठवड्यात उपलब्ध करुन द्याव्यात नसता बीड जिल्हा वकील संघही न्यायालयाच्या कोणत्याही कार्यक्रमामध्ये सहभाग नोंदवणार नसल्याचे निवेदनामध्ये म्हटले आहे. निवेदनावर वकील संघाचे अध्यक्ष ड. आर. डी. येवले आणि सचिव ड.यासेर पटेल यांची स्वाक्षरी आहे.

# तुमच्या वृत्तांकनातून होऊ देत वेव्हज अर्थात आशयघन लहरींची निर्मिती !

## जागतिक दृकश्राव्य मनोरंजन शिखर परिषद (वेव्हज) २०२५ साठी माध्यम प्रतिनिधींची नोंदणी सुरू


मुंबई ।प्रतिनिधी

मुबईत १ ते ४ मे २०२५ दरम्यान होणारी पहिली वाहिली जागतिक दृकश्राव्य मनोरंजन शिखर परिषद (वेव्हज) ही जागतिक माध्यमे आणि मनोरंजन (एम आणि ई) उद्योगात लाटा निर्माण करण्यासाठी सज्ज आहे. परिषदेच्या आयोजनाची तयारी अंतिम टप्प्यात असताना आता परिषदेच्या वृत्तांकनासाठी येवू इच्छिणाऱ्या माध्यम प्रतिनिधींच्या नोंदणीला २५ मार्च २०२५ पासून प्रारंभ झाला आहे. या नोंदणीच्या माध्यमातून कार्यक्रमाचे वृत्तांकन करण्यासाठी पत्रकार, छायाचित्रकार, आशय निर्माते आणि माध्यम विश्वातील तज्ज्ञांना आमंत्रित करण्यात आले आहे. नोंदणी करा आणि प्रतिभेचा उत्तुंग अविष्कार दर्शवणारे वृत्तांकन करून जगातील आशयनिर्मात्यांना जोडण्यासाठी आणि भारतातील माध्यमे आणि मनोरंजन क्षेत्राला अधिक समृद्ध करण्यासाठी सज्ज व्हा. तुमचे वार्तांकन खरोखर वेव्हज अर्थात माहितीविषयक तरंग निर्मिती करेल.

जर तुम्हाला पत्रकारिता, माध्यम उद्योग किंवा आशय कथनाची आवड असेल, तुम्ही पत्रकार असाल , कॅमेरापर्सन, आशय निर्माते किंवा समाज माध्यमातील व्यावसायिक असाल, तर तुम्ही वेव्हज २०२५ चुकवू शकत नाही! येथे होणाऱ्या चर्चासत्रात सहभागी व्हा, उद्योगधुरीणांकडून शिका आणि उदयोन्मुख क्रिएटर्सना योग्य व्यासपीठ मिळवून देण्यासाठी सहाय्य करा. वेव्हज शिखर परिषद २०२५ हे तुमच्यासाठी उद्योगांची अंतर्दृष्टी प्रदान करणारे, जागतिक नेटवर्किंग तसेच माध्यमे आणि मनोरंजन क्षेत्रातील अभूतपूर्व नाविन्यपूर्ण कल्पनांचा वेध घेण्यासाठी एक खुले प्रवेशद्वार ठरेल.

माध्यम प्रतिनिधींची नोंदणी प्रक्रिया

वेव्हज माध्यम प्रतिनिधी म्हणून नोंदणी करण्यासाठी, अर्जदारांनी हे करणे आवश्यक आहे:१ जानेवारी २०२५ पर्यंत १८ वर्षे किंवा त्याहून अधिक वय असावे.मान्यताप्राप्त प्रसार




माध्यमांवर वार्ताहर, छायाचित्रकार, कॅमेरा पर्सन किंवा डिजिटल कंटेंट क्रिएटर म्हणून काम केलेले असावे. वरील निकष पूर्ण करणारे फ्रीलांस पत्रकार देखील पात्र आहेत.नोंदणी कधी सुरु होणार : २६ मार्च २०२५ नोंदणी अंतिम तारीख: १० एप्रिल २०२५ रोजी रात्री ११:५९ माध्यम प्रतिनिधी पास संकलन: मान्यता मिळालेल्या माध्यम प्रतिनिधींना माध्यम प्रतिनिधी पास संकलन करण्यासंदर्भातील तपशीलांची माहिती योग्य वेळी दिली जाईल. माध्यम प्रतिनिधी नोंदणी धोरणाविषयीच्या माहितीसाठी येथे पहा.परिशिष्ट ब नुसार माध्यम प्रतिनिधी नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रांची यादी येथे शोधानोंदणी प्रक्रियेच्या वेळी सर्व आवश्यक कागदपत्र अपलोड केले आहेत याची कृपया खात्री करून घ्या. सर्व अर्जांची पडताळणी केल्यानंतर मीडिया ॲक्रिडिटेशनची मंजुरी ईमेलद्वारे कळवली जाईल. फक्त पीआयबी-मान्यताप्राप्त माध्यम प्रतिनिधीच, माध्यम प्रतिनिधी पाससाठी पात्र असतील. याविषयीची मान्यता, माध्यम संस्थेचा आवाका, पुनरावृत्ती, मनोरंजन क्षेत्राला दिलेले प्राधान्य आणि वेव्हज च्या अपेक्षित वृत्तांकनावर आधारित असेल.

तुम्ही या उद्योग क्षेत्रातील व्यावसायिक असा अथवा, गुंतवणूकदार, सर्जक अथवा नाविन्यपूर्ण निर्मिती करणारे असा, या शिखर परिषदेत तुम्हाला इतरांशी जोडले जाण्यासाठी, सहयोगासाठी, नव्या संशोधनासाठी तसेच माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राच्या परीदृश्यात योगदान देण्यासाठी अनोखा जागतिक मंच उपलब्ध होईल.वेव्हज हे भारतातील अशा प्रकारचे पहिलेच जागतिक व्यासपीठ आहे जे आशय सामग्री निर्मिती, बौद्धिक संपदा आणि तांत्रिक नवोन्मेष यांसाठीचे महत्त्वाचे केंद्र म्हणून भारताचे स्थान उंचावत देशाच्या सर्जनशील क्षमतेला बळकटी देईल. हा कार्यक्रम उद्योगातील आघाडीच्या व्यावसायिकांना एकत्र आणेल : प्रसारण, मुद्रित माध्यमे, दूरदर्शन, आकाशवाणी, चित्रपट, ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग, कॉमिक्स, ध्वनी आणि संगीत, जाहिरात, डिजिटल माध्यम, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म, निर्मितीक्षम कृत्रिम बुद्धिमत्ता, वर्धित वास्तव (अग्युमेन्टेड रियालिटी), आभासी वास्तव (व्हीआर) आणि विस्तारित वास्तव (एक्सआर).

प्रमुख ठळक कार्यक्रम जे तुम्ही चुकवू शकत नाही

'क्रिएट इन इंडिया चॅलेंज - जगभरातील नवोदित निर्मात्यांच्या प्रतिभेचा अविष्कार साजरा करणारा एक अभूतपूर्व उपक्रम, अर्थात मुंबईत होणाऱ्या वेव्हज २०२५ मध्ये आपल्या प्रतिभेची झलक दाखवण्यासाठी 'वेव्हज' हे एक आघाडीचे व्यासपीठ म्हणून सज्ज आहे.वेव्हेक्स २०२५ - हा उपक्रम एक मैलाचा दगड ठरणारा असून यामाध्यमातून मीडिया-टेक स्टार्टअप्स त्यांच्या नवकल्पना आघाडीच्या उद्योग धुरिणांसमोर आणि सेलिब्रिटी एंजल गुंतवणूकदारांसमोर सादर करतील, ज्यामुळे भारताच्या माध्यम आणि मनोरंजन परिसंस्थेच्या भविष्याला नवीन दिशा मिळेल.वेव्हज बाजार: चित्रपट, गेमिंग, संगीत, जाहिरात आणि एक्सआर, निर्माते, गुंतवणूकदार आणि इतर व्यवसायांना जोडणारी एक अद्वितीय जागतिक बाजारपेठ. यातूनच उद्योग व्यावसायिकांना उत्पन्नाचे नवीन स्रोत उघडण्याच्या संधी देखील देते.मास्टरक्लासेस आणि परस्परसंवादी सत्रे - उद्योगातील दिग्गज आणि जागतिक नेत्यांकडून शिकण्याची, माध्यम, मनोरंजन आणि तंत्रज्ञानाच्या भविष्याबद्दल अंतर्दृष्टी मिळविण्याची एक दुर्मिळ संधी.या आमच्याबरोबर या लाटांवर स्वार व्हा, जर तुम्ही अभ्यागत असाल तर येथे नोंदणी करा; आणि जर विद्यार्थी असाल तर येथे नोंदणी करा पीआयबीच्या टीम वेव्हज कडून येणाऱ्या नवीनतम घोषणांसह अपडेट राहा.तुम्हाला काही प्रश्न आहेत का ? येथे त्यांची उत्तरे मिळावा.

# जिल्हयातील ३ हजार ७६७ वीजग्राहकांना 'अभय'चा लाभ

## लाभ घेण्यासाठी उरले केवळ पाच दिवस

बीड ।प्रतिनिधी

कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित झालेल्या वीजग्राहकांसाठी महावितरणने सुरू केलेल्या अभय योजनेचा लाभ घेत बीड मंडळातील ३ हजार ७६७ वीजग्राहकांनी १० कोटी ९९ लाख रूपयांची थकबाकी भरत पुनर्जोडणी घेतली आहे. अभय योजनेची मुदत ३१ मार्च २०२५ रोजी संपत आहे. उरलेल्या पाच दिवसात पात्र ग्राहकांनी योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

आंबाजोगाई विभागातील धारूर उपविभागाच्या १५१ वीजग्राहकांनी १२ लाख रूपयांचा भरणा करत १४ लाख रूपयांची सुट मिळवली आहे. केज उपविभागातील १७४ वीजग्राहकांनी १२ लाख रूपयांचा भरणा करत ७ लाख रूपयांची सुट मिळवली आहे, माजलगाव उपविभागातील २६१ वीजग्राहकांनी ४२ लाख रूपयांचा भरणा करत ३८ लाख रूपयांची सुट मिळवली आहे, परळी उपविभागातील १५७ वीजग्राहकांनी ३ कोटी ३० लाख रूपयांचा भरणा करत ३ कोटी ८ लाख रूपयांची सुट मिळवली आहे, तेलगाव उपविभागातील १३६ वीजग्राहकांनी १९ लाख रूपयांचा भरणा करत २१ लाख रूपयांची सुट मिळवली आहे, तर आंबाजोगाई उपविभागातील १८९ वीजग्राहकांनी ३ कोटी ६० लाख रूपयांचा भरणा करत १ कोटी ३१ लाख रूपयांची सुट मिळवली आहे.

बीड विभागा अंतर्गत येणाऱ्या आष्टी उपविभागातील २१४ वीजग्राहकांनी २४ लाख रूपयांचा भरणा करत २२ लाख रूपयांची सुट मिळवली आहे, बीड शहर उपविभागातील ३१२ वीजग्राहकांनी ७९ लाख रूपयांचा भरणा करत ७२ लाख रूपयांची सुट मिळवली आहे. बीड ग्रामीण उपविभागातील ५०२ वीजग्राहकांनी ५८ लाख रूपयांचा भरणा करत ७४ लाख रूपयांची सुट मिळवली आहे, गेवराई उपविभागातील १०१४ वीजग्राहकांनी १ कोटी १० लाख रूपयांचा भरणा करत १ कोटी रूपयांची सुट मिळवली आहे, पाटोदा उपविभागातील २३५ वीजग्राहकांनी २२ लाख रूपयांचा भरणा करत २१ लाख रूपयांची सुट मिळवली आहे. तसेच शिरूर कासार उपविभागातील ४२२ वीजग्राहकांनी ३० लाख रूपयांचा भरणा करत ३४ लाख रूपयांची सुट मिळवल्याचा समावेश आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार, वीजबिलांची थकबाकी असलेल्या एखाद्या जागेची मालकी बदलली तरी नवीन जागा मालकाला किंवा ताबेदारास थकबाकी भरावीच लागते. त्यामुळे वीजबील थकीत असलेल्या ग्राहकांनी पाच दिवसात अभय योजनेचा लाभ घ्यावा. दोनवेळा मुदतवाढ मिळालेल्या या योजनेस पुन्हा मुदतवाढ न देण्याचा निर्णय महावितरणने घेतला आहे. थकबाकीदारांनी केवळ मूळ थकबाकीचा भरणा केल्यास १०० टक्के व्याज व विलंब आकार (दंड) माफ होत आहे. मूळ थकबाकीचा एकरकमी भरणा केल्यास लघुदाब ग्राहकांना १० टक्के तर उच्चदाब ग्राहकांना ५ टक्के अतिरिक्त सवलत मिळत आहे. यासोबतच सुरुवातीस मूळ थकबाकीच्या ३० टक्के रक्कम भरून उर्वरित ७० टक्के रक्कम व्याजमुक्त सहा हप्त्यांत भरण्याचीही सोय आहे. तसेच लाभार्थी ग्राहकांना मागणीनुसार त्या जागेवर नव्याने वीजजोडणी दिली जाणार आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी केवळ पाचच दिवस शिल्लक असून, थकबाकीमुक्तीसाठी वीजग्राहकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणच्या लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी केले आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान आता मंडळ स्तरावर

### महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

मुंबई ।प्रतिनिधी

महसूल विभागांतर्गत राज्यातील सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी निकालात काढणे, तसेच महसूल प्रशासन अधिकाधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी राज्यामध्ये यापुढे मंडळ स्तरावर समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. जिल्हा वार्षिक योजनेमधून 'गतिमान प्रशासन तथा आपत्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण' अंतर्गत मंडळ स्तरावर हे अभियान राबविण्यात येणार असून त्याचे नामकरण 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान' असे करण्यात आले असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानपरिषदेत सांगितले. याबाबतचा शासन निर्णय, दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी निर्गमित करण्यात आला असल्याची माहिती त्यांनी दिली.या निर्णयानुसार प्रत्येक जिल्ह्यातील तालुक्यामध्ये मंडळ स्तरावर वर्षातून किमान चार वेळा 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान' आयोजित करण्यात येणार असून प्रत्येक शिबिरासाठी २५ हजार रुपये इतका खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांना रहिवाशी, उत्पन्न व जातीचे दाखले, रेशन कार्ड यांचे वाटप, संजय गांधी निराधार योजना, पीएम किसान योजना आदी सामाजिक लाभाच्या योजना इत्यादींचा लाभ देण्यात येईल. तसेच या अभियानांतर्गत सात-बारा वाटप, प्रलंबित फेरफार नोंदी निर्गत करणे व विविध शासकीय योजनासाठी लागणारे दाखले अशा महसूल विभागाच्या विविध योजना आदींबाबत सुद्धा आवश्यक ते कामकाज करण्यात येईल, असेही मंत्री श्री.बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

या अभियानांतर्गत महसूली प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्याच्या अनुषंगाने प्रयत्नशील राहण्याच्या सूचना सर्व महसुली अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात आल्या असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.




॥ श्री वीरभद्र प्रसा ॥ ॥ श्री गणेशाय नमः ॥ ॥ श्री वरदायनरी प्रसन्न ॥

पिंपरी चिंचवड शहर जंगम समाज संस्था

नोंदणी क्र. : महाराष्ट्र ६४०/२०११/पुणे दि. ०८/०४/२०११

सं .नं. १८/२/१/१, एकता कॉलनी, लेन नं. १, गणेश नगर, थेरगाव, पुणे ४११०३३

आयोजित

राज्यस्तरीय ९ वा जंगम वधू-वर कौटूंबिक परिचय मेळावा

वेळ : रविवार दि. १३ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० ते सायं. ५ पर्यंत

स्थळ :- श्री खंडोबा मंदिर सांस्कृतिक भवन, मुंबई-पुणे रोड, आकुर्डी, पुणे ४११०३५

मेळावा स्वरुपाबाबत सूचना

१) प्रवेश फी प्रत्येकी रु. ३००/- (भोजन व चहासह) ही मेळाव्यामध्ये प्रवेश घेण्यापूर्वी स्वागत कक्षावर भरावी लागेल.
२) वधू-वरांनी परिचय-पत्रक संपूर्णपणे भरुन आमच्या अधिकृत कार्यकर्त्याकडे द्यावे.
३) नोंदणी करताना वधू-वरांचे फोटो आवश्यक (फोटो साईज ४ / ६ व पासपोर्ट साईज प्रत्येकी १) अनिवार्य)
४) ऑनलाईन यादीमध्ये फोटो टाकण्यात येणार असल्यामुळे रंगीत फोटो आवश्यक (अनिवार्य)
५) आपले नाव पुकारल्यानंतर वधु-वरांसह व्यासपीठावर येऊन आपली माहीती थोडक्यात वाचून दाखवावी.
६) जे वधू-वर काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहणार नाही. त्या पालकांना वधू-वरांसह प्रवेश फी भरावी लागेल. त्यानी त्यांचे वधू-वर परिचय पत्रक भरुन द्यावे. त्यांनी शेवटी त्यांचे नाव पुकारल्यानंतर व्यासपीठावर येऊन माहीती द्यावी.
७) वधू-वर घटस्पोटीत विधवा, विधूर, दिव्यांग असल्यासत्याचा उल्लेख नोंदणी फॉर्म मध्ये करावा, हे फॉर्म मेळाव्याच्या ठिकाणी शेवटी वाचण्यात येतील.
८) विवाह मेळावा माध्यमातून विवाह जमल्यास कृपया त्वरीत विभाग प्रमुख यांना कळवावे.
९) मेळाव्यास येणाऱ्या वधु-वरांनी आपला बायोडेटा पुर्व नोंदणी करिता वधु-वर प्रमुख किंवा नोंदणी कार्यकर्त्याशी संपर्क करावा. नोंदणीसाठी काही सूचना अथवा अडचण असल्यास मेळाव्यापूवी संबंधीतांना कळवाव्यात.
१०) वधू-वर किंवा त्यांचे पालक मेळाव्यात उपस्थित असतील तरच त्याचा बायोडाटा वाचून दाखविण्यात येईल.

आयोजक

नोंदणीसाठी संपर्क
सौ. जयश्री विजय जंगम( वधू-वर सूचक विभाग प्रमुख )
मो. 9922740483 / Email: jangamjayashri1965@gmail.com
मा. मू. जर्नादन जंगम , 9923510703 / सौ. वर्षाताई बागले, 9766632772

कार्यकारिणी

अध्यक्ष : विजय जंगम, मो.9767278505

उपाध्यक्ष: मा. मू. अनिकेत जंगम
सचिव : मा. मू. जनार्दन जंगम
खजिनदार : मा. मू. प्रदिप जोतकर
कार्याध्यक्ष : मा. मू. संदिप घोणसे
सदस्य : मा. मू. विजय जंगम
सदस्य : मा. मू. बसय्या हत्तुरमठ
सदस्य : मा. मू. शिवप्रसाद जंगम
सदस्य: मा. मू. विलास जंगम
सदस्य: मा. मू. बाळासाहेब संगमे
सदस्य: मा. मू. प्रशांत जंगम
सदस्य : मा. मू. अशिष जंगम
सदस्य: सौ. संध्या स्वामी
सदस्य: सौ. वर्षा बागले

मार्गदर्शक

मा. मू. गुरुराज चरंतीमठ
मा.मू. विश्वनाथ स्वामी
मा.मू. संजय मानुरकर
मा.मू.प्रशांत भानसे
मा. मू. राजेश चिट्टे
मा.मु. विनोद लोणकर

महिलाआघाडी

महिला आघाडी अध्यक्षा ,सौ. संध्या स्वामी मो - 918698650921
सौ. छाया जंगम, सौ. सुमंगला मुथ्थलगिरी, सौ. रंजना संगमे, सौ. महादेवी जंगम, सौ. मंजुश्री स्वामी, सौ. तेजश्री जंगम, सौ. राणी स्वामी, सौ. सुनिता कसबेकर, सौ. मधुमती जंगम
प्रसिद्धी प्रमुख - जगदीश जंगम - 9822286883
सर्व विभाग प्रमुख, महिला आघाडी तथा युवा आघाडी आणि सर्व सन्माननीय सभासद
टीप : कार्यक्रमात अंशतः बदल करण्याचे सर्व अधिकार संस्थेने राखून ठेवण्यात आलेले आहेत

## गोंधळी समाजाला वडवणी शहरात सभागृहाला जागा उपलब्ध करून देयावी



वडवणी ।प्रतिनिधी

आज दिनांक २५/०३/२०२५ बुधवार रोजी समस्त गोंधळी समाज वडवणी च्या वतीने नगरपंचायत कार्यालय वडवणी येथे मुख्याधिकारी साहेब यांना लेखी निवेदन देऊन वडवणी शहरातील गोंधळी समाजाला सभागृहा साठी जागा उपलब्ध करून देण्यात यावे अशी मागणी केली.गोंधळी समाज हा गरिब व आपली कला जपून घरोघरी जाऊन भिक्षा मागून आपली उपजीविका भागवितो.आमच्या समाजातील धार्मिक कार्यक्रम, विवाह सोहळा, सामाजिक कार्यक्रम आयोजित करण्यासाठी स्वतांचे सभागृहाची आवश्यक आहे.करिता शासनाने गोंधळी समाजाला सभागृहा साठी जागा उपलब्ध करून देयावी अशी मागणी केली आहे.यावेळी समाजातील जेष्ठ नागरिक कैलासराव काटे, गोरख काटे, बालाजी धुमाळ,लिंबाजी ढवळे,लखन धुमाळ, विनोद धुमाळ, रामेश्वर धुमाळ,पाराजी शिंदे , अशोक भांडे,लहू दूनगू, आदित्य दुनगू.इ.समाज बांधव उपस्थित होते.या वेळी मुख्याधिकारी साहेब यांनी आश्वासन दिले की लवकरात लवकर आपलेला जागा उपलब्ध करून देऊ.

## पहिली महिला पत्रकार प्रिया पवळ यांचा अंभोरा पोलीस ठाण्यामार्फत

## सत्कार करुन कौतुकाची थाप...

अंभोरा पोलीस ठाण्यात मनुष्यबळ कमी असल्याचे मांडले गऱ्हाणे

आष्टी(प्रिया पवळ)

तालुक्यातील सुलेमान देवळा येथील प्रिया सोन्याबापू पवळ ही मुलगी नवोदित पत्रकार व आष्टी तालुक्यातील पहिली महिला पत्रकार म्हणून सन्मानित तिच्या निवडीबद्दल सर्वत्र पंचक्रोशीतुन कौतुकाची थाप होऊन सत्कार समारंभ होतं असताना काल दि.२५ रोजी अंभोरा पोलीस ठाणे अंतर्गत पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे साहेब यांनी नवोदित पत्रकार प्रिया पवळ यांचा सत्कार केला पुढील पत्रकारिता साठी शुभेच्छा देऊन चोरी दरोडा व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना आळा बसविण्यासाठी प्रत्येक जन सतर्क असायला हवा म्हणजे आपल्या राहत्या घरी व्यावसायिक ठिकाणी



प्रत्येकाने सीसीटीव्ही कॅमेरे बसून स्वतःची सुरक्षितता व पोलीस कर्मचाऱ्यांना सहकार्य केले तर भविष्यात होणारी हानी टळली जाईल असे पोलीस स्टेशनचे सपोनि मंगेश साळवे साहेब यांनी नवोदित पहिली महिला पत्रकार प्रिया पवळ यांचा सत्कार करताना सांगितले व त्याचबरोबर अंभोरा पोलीस ठाणे हे बीड जिल्ह्यातील सर्वात मोठे रजाकाराच्या काळातले पोलीस स्टेशन असून या पोलीस स्टेशन अंतर्गत सर्वाधिक गावे समाविष्ट आहेत त्याकरिता या पोलीस स्टेशनमध्ये म्हणावे असे मनुष्यबळ नसल्याकारणाने हवे तिथे व हक्काच्या अंतरावर पोलीस कर्मचारी जाऊ शकत नाही त्याकरिता मी स्वतः लवकरच एस पी साहेब नवनीत काँवत साहेब यांना निवेदन देऊन पुरेसे मनुष्यबळ द्यावे अशी विनंती करणार आहे असे पोलीस अधीक्षक मंगेश साळवे यांनी सांगितले या प्रसंगी कर्तव्यदक्ष पो. कॉ.शिवदास केदार,समाजसेवक शौकत पठाण, दैनिक पुढारीचे पत्रकार प्रेम पवळ व नवोदित सत्कारमूर्ती पत्रकार प्रिया पवळ सह अंभोरा पोलीस उपस्थित होते.

पुरेसे मनुष्यबळ मिळण्यासाठी

आम्ही पाठ पुरवा करु परंतु वाढत्या चोरी दरोडा या करिता आपण सतर्क राहून रात्री पेट्रोलियम करावे .

-समाजसेवक शौकत पठाण

## स्वत:च्या हक्काच्या घरासाठी बीडकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद !

बीड ।प्रतिनिधी

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत द्वारकाधीश मित्र मंडळाच्या वतीने मोफत ऑनलाइन फॉर्म भरणा शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शहरातील व वार्डतील अनेक इच्छुक लाभार्थ्यांनी आपल्या हक्काच्या घरासाठी मोफत अर्ज भरले.

या शिबिरात लाभार्थ्यांना अर्ज भरून देण्यात आले. तसेच अर्जाच्या यशस्वी नोंदणीसाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. शिबिराच्या समारोपप्रसंगी अर्ज भरलेल्या नागरिकांना अधिकृत पावती देण्यात आली.यावेळी नगरसेवक जगदीश गुरखुदे, परशुराम गुरखुदे, तसेच या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष मेहनत घेतलेल्या राजू शेख यांचे उपस्थित लाभार्थ्यांनी मनःपूर्वक आभार मानले. तसेच बीड नगरपरिषदेचे कर्मचारी तांबारे साहेब व शुभम सावंत यांनी देखील या उपक्रमात सहकार्य केले.

कार्यक्रमाला शेख आयाज, सचीन जगताप सोनु अकंल राजकुमार जैन नजीर भाई अक्षय भालेराव आरेफ शेख,



विशाल जोशी जीलानी भाई अकाश जवकर रोहीत कुलकर्णी यश गुरखुदे गोविंद सरदे तसेच व इतर द्वारकाधीश मित्र मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते. शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरासाठी अर्ज करण्याची मोठी संधी मिळाली. भविष्यात अशा उपक्रमांचे आयोजन करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## महाराष्ट्र विधानमंडळ अधिवेशन यशस्वीपणे संपन्न

### १२ महत्त्वाचे कायदे मंजूर, अर्थसंकल्पावर सकारात्मक चर्चा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई ।प्रतिनिधी

महाराष्ट्र विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात एकूण १२ महत्त्वाचे कायदे मंजूर करण्यात आले असून,दरदिवशी सरासरी ९ तास कामकाज चालले. राज्यासमोरील महत्त्वाच्या प्रश्नांवर विस्तृत चर्चा झाली. सरकारने चर्चेला सकारात्मक प्रतिसाद दिला असून, विरोधी पक्षालाही त्यांच्या मुद्द्यांसाठी संपूर्ण संधी देण्यात आल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे,इतर मागासवर्गीय मंत्री अतुल सावे, राज्यमंत्री आशिष जयस्वाल उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की,या अधिवेशनात महत्वाच्या विधेयकांमध्ये माथाडी कामगार कायद्यातील सुधारणा विधेयकाचा समावेश होता या विधेयकामुळे बनावट माथाडी आणि ब्लॅकमेलिंग रोखण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक विधेयक आणि विनियोजन विधेयकासह अनेक महत्त्वाची विधेयके संमत करण्यात आली आहेत.या अधिवेशनात संविधानावर विशेष चर्चा झाली, तसेच अर्थमंत्री महोदयांनी शेती, उद्योग, पायाभूत सुविधा, रोजगार आणि सामाजिक विकास या पंचसूत्रीवर आधारित अर्थसंकल्प सादर केला आहे,जो महाराष्ट्राच्या विकासाला नवी गती देईल.अधिवेशनात मंत्र्यांनी सक्रीय सहभाग घेतला, अनेक प्रश्नांवर स्पष्टीकरणे दिली आणि कामकाज सुरळीत पार पाडले. संख्येने कमी असलेल्या विरोधी पक्षालाही चर्चा करण्यासाठी संपूर्ण संधी देण्यात आल्याचे स्पष्ट झाले.

मुख्यमंत्री यांनी अधिवेशनाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व आमदार, मंत्री, पिठासीन अधिकारी, विधानमंडळ कर्मचारी आणि माध्यमांचे मनःपूर्वक आभार मानले.१३ कोटी लोकांच्या विकासाचा अर्थसंकल्प :- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की,सर्व कल्याणकारी योजना सुरू ठेवून अर्थव्यवस्था बिघडू न देता अर्थसकंल्प सादर केला.राज्यातील १३ कोटी लोकांच्या विकासाच्या दृष्टीने विचार करून अर्थमंत्री अजित पवार यांनी अतिशय चांगला अर्थसंकल्प सादर केला आहे. विकासाचे आणि लोकाभिमुख प्रकल्प शासन राबवित आहे. शेतकरी, कष्टकरी , कामगार वर्ग या सर्व घटकांचा विचार राज्य चालवताना करत आहोत.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, एकीकडे विकास प्रकल्प दुसरीकडे कल्याणकारी योजना पुढे नेताना सर्वसामान्यांना केंद्रबिंदू मानून आम्ही काम केले आहे. परकीय गुंतवणूक वाढविण्यातही राज्य अग्रेसर असून, दोओस येथे झालेल्या परिषदेत १५ लाख कोटीचे करार करण्यात आले. एक खिडकी योजनेअंतर्गत राज्यात उद्योग क्षेत्रात गुंतवणूक वाढावी यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. उद्योगस्नेही वातावरण निर्माण करण्यासाठी उद्योगांना प्रोत्साहन दिले जात आहे. स्टार्ट अपमध्ये राज्य अव्वल असून, कर्ज ही आपल्या राज्यावर इतर राज्यांच्या तुलनेत कमी आहे. १०० दिवसांच्या कामकाजाचे उद्दीष्ट मुख्यमंत्री यांनी दिले होते, त्यानुसार सर्व विभागांनी उत्तम काम पार पाडले असून, अनेक विभागांनी उद्दीष्ट पुर्ण केले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

## सम्राट अशोक नगर जयंती अध्यक्षपदी सन्नी प्रधान, तर उपाध्यक्षपदी रोहित साळवे

माजलगाव(प्रतिनिधी) सम्राट अशोक नगर येथील दरवर्षीप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. एम.बि.चांदमारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जयंती कार्यकारिणी एकमताने निवड करण्यात आली. ती पुढीलप्रमाणे अध्यक्ष - सनी(भाऊ)प्रधान, उपाध्यक्ष -रोहित साळवे, कोषध्यक्ष - विशाल पायके, सचिव - राहुल भद्रे, विकास शरणांगत,अजय साळवे व इतरांचा या कार्यकारिणीत समावेश आहे. यावेळी अविनाश जावळे (ता.अध्यक्ष आरपीआय), विजय साळवे(जिल्हा अध्यक्ष आरपीआय),भारत तांगडे (जिल्हा उपाध्यक्ष वंचित बहुजन आघाडी),राकेश साळवे(ता.अध्यक्ष पीआरपी), यू.के.जोगदंड,डावरेसर, अॅड.खळगे,अलझेंडे सर,वैराळे सर,भोजने साहेब,थोरात राजाभाऊ,लिंबाजी गायकवाड,खुणेसाहेब,जाधव साहेब,धम्मपाल देशमाने, मगरेसाहेब,पत्रकार रविन्द्र राऊत व इतर सम्राट अशोक नगर मधील मान्यवर मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिद्धार्थ ससाणे यांनी केले तर आभार प्रदर्शन पत्रकार अमर साळवे यांनी केले.

## ऊसतोड कामगारांच्या आरोग्य समस्यांसाठी टास्क फोर्स स्थापन करावा

### उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

मुंबई ।प्रतिनिधी

राज्यातील ऊसतोड कामगारांच्या आरोग्यविषयक समस्यांचे प्रभावी निराकरण करण्यासाठी स्वतंत्र टास्क फोर्स स्थापन करावा, असे निर्देश विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले.बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगार महिलांच्या गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रिया प्रकरणी गठीत समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला. त्या अनुषंगाने मंत्रालयीन विभागाने केलेल्या कारवाईचा आढावा घेण्यासाठी विधानभवनात उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली.

उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या की, ऊसतोड कामगार महामंडळ कार्यरत असल्याने सामाजिक न्याय विभागाने ऊसतोड कामगार महामंडळ आणि अन्य संबंधित विभागांच्या सहकार्याने सामाजिक न्याय मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्स स्थापन करावा.या टास्क फोर्सच्या स्थापनेमुळे ऊसतोड कामगार महिलांच्या आरोग्यविषयक समस्यांचे निराकरण करण्यास गती मिळेल. तसेच मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या व समिती अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही करावी असे निर्देशही डॉ. गोऱ्हे यांनी दिले.

## किरण शिनगीरे यांचा इंटरनॅशनल आयकॉन अवॉर्ड या आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मान

आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील कडा येथील अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे गांधी महाविद्यालयाचे मा. जनरल सेक्रेटरी (जी.एस.) किरण भगवानराव शिनगीरे यांचा वॅक बुक ऑफ रेकॉर्ड कडून इंटरनॅशनल आयकॉन अवॉर्ड या आंतरराष्ट्रीय पुरस्काराने वॅक बुक ऑफ रेकॉर्डच्या अध्यक्षा डॉक्टर ज्योती दियावर व विजय बजाज यांच्या हस्ते नुकताच सन्मान करण्यात आला.

किरण शिनगीरे यांनी सन २०१९ - २० यावर्षी युवकांचे संघटन करून वटणवाडी तालुका आष्टी येथे गांधी महाविद्यालयाचा गावात ७ दिवस कॅम्प घेऊन वृक्षारोपण केले, स्वच्छता मोहीम राबवली. गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीजवळ श्रमदानातून बंधारा तयार केला. पाण्याचे जल व्यवस्थापन कसे करावे? याबाबत तज्ञांकडून गावात युवक व ग्रामस्थांना मार्गदर्शन केले, तसेच जलसंवर्धनासाठी युवकांचे योगदान, ग्रामसमृद्धी मध्ये महिलांचे योगदान, विज्ञान विकास, अध्यात्म व विकास, कवी संमेलन याबाबत तज्ञांनी मार्गदर्शन केले.

राष्ट्रीय एकात्मता, पर्यावरण जागृती, ग्रामस्वच्छता, मतदानाच्या हक्काविषयी जनजागृती केली, बेटी बचाओ बेटी पढाओ, जलसाक्षरता, अंधश्रद्धानिर्मूलन इत्यादी. तसेच मंदिर व शाळा परिसरात वृक्षारोपण व संवर्धन केले. यापुढील कोरोनाच्या काळात कोरोना विषयी जनजागृती केली, त्याचबरोबर मास्क, सॅनिटायझर, मोफत धान्य वाटप, आर्सेनिक गोळ्यांचे वाटप, संतूर व डेटॉल साबणचे व हँडवॉश वाटप, इत्यादी वस्तूंचे वाटप केले, बचत गटाविषयी जनजागृती, लसीकरण मोहीमेत सक्रिय सहभाग, आभा कार्ड विषयी जनजागृती इत्यादी कार्य केले. त्यापुढील काळात पुन्हा गांधी महाविद्यालयाचा वटनवाडी या गावात सात दिवस कॅम्प घेऊन त्यामध्ये विविध कार्य केले. तसेच पुढील काळात मौजे देवीनिमगाव येथे कॅम्पमध्ये प्लास्टिक मुक्ती मोहीम, ग्राम स्वच्छता, मतदानाविषयी जनजागृती, हिमोग्लोबिन व रक्तगट तपासणी केली.



त्याचबरोबर वडनवाडी येथे मुख्यमंत्री लाडकी बहिणी योजनेचा कॅम घेऊन ५१ महिलांचे मोफत फॉर्म भरून दिले, साक्षरता विषय जनजागृती, रेशन विषयक जनजागृती, सामाजिक क्य वाढवणे इत्यादी कार्य केले. या सर्व कार्याची दखल घेऊन त्यांना वॅक बुक ऑफ रेकॉर्ड कडून विविध क्षेत्रातील पुरस्कार जाहिर करण्यात आले होते. त्यामध्ये वर्ष २०२५ किरण शिनगीरे यांना इंटरनॅशनल आयकॉन अवॉर्ड या आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच त्यांना यापूर्वीही राज्यस्तरीय कोरोना योद्धा पुरस्काराने जि. अकोला, राज्यस्तरीय आदर्श युवा महाराष्ट्र युथ आयडॉल समाज रत्न पुरस्कार नाशिक, राज्यस्तरीय यशवंत रत्न पुरस्कार बीड, राष्ट्रीय नॅशनल आयकॉन पुरस्काराने दिल्ली येथे सन्मानित करण्यात आलेले आहे.

या मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे आमदार सुरेश अण्णा धस, प्राजक्ताताई धस, सागर धस, भगवानराव शिनगीरे, बीड जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के, संस्थाचालक वैजिनाथ निर्मळ, अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष योगेश भंडारी, कार्याध्यक्ष कांतिलालजी चानोदिया, सचिव हेमंत पोखरना, कोषाध्यक्ष डॉ. उमेश गांधी, डॉ. महेंद्र पटवा, माजी शिक्षणाधिकारी विक्रम पोकळे, झुंजारनेताचे उपसंपादक उत्तम बोडखे, कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रामशेठ मधुरकर, सरपंच सतीशशेठ धस, पत्रकार रामदास जाधव, गांधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जवाहरलाल भंडारी, माजी प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी, प्राचार्य बनाळे सर, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. राजकुमार थोरवे, प्रा. डॉ. नवनाथ विधाते, प्रा. डॉ. नरेंद्र गवळी, प्रा. डॉ. सोमनाथ हासे, प्रा. डॉ. शिवाजी जगदाळे, प्रा. डॉ. शिवराज पातळे, प्रा. डॉ. तुकाराम गोंदकर, डॉ. जमीर सय्यद, जाधव सर, केदार सर, आडकर सर, मिसाळ सर, बोडखे सर, अरुणा कुलकर्णी मॅडम, धनश्री मुनोत मॅडम मॅडम, मीरा नाथ मॅडम, पूजा बोरा मॅडम सह आदी प्राध्यापक, पत्रकार अविनाश कदम, पत्रकार प्रवीण पोकळे, अक्षय विधाते, समीर शेख, अहिल्यानगरच्या जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हा अध्यक्षा स्वाती जाधव, मा. सरपंच छगन शिनगिरे, सरपंच सागर दहातोंडे, उपसरपंच संतोष मुटकुळे, बाळासाहेब खकाळ, विठ्ठल काकडे, राजू मुटकुळे, राम देशमुख, गोकुळ गावडे, असलम शेख, सौरव गुंड, जगदीश वनवे, सह विद्यार्थ्यांनी, ग्रामस्थांनी व आष्टी तालुक्यातील विविध संघटनेने ही त्यांचे अभिनंदन केले.

## नागपूर येथील राज्यस्तरीय दिव्यांग क्रीडा स्पर्धेत शाहू महाराज निवासी मूकबधिर विद्यालयाचे यश

आष्टी ।प्रतिनिधी


दिव्यांग कल्याण आयुक्तालय महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने नागपूर येथे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय मुला - मुलींच्या दिव्यांग क्रीडा स्पर्धेमध्ये आष्टी येथील शाहू महाराज निवासी मूकबधिर विद्यालयातील दोन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी ओम गजानन गायकवाड हा विद्यार्थी वयोगट १३ ते १६ लांब उडी या प्रकारामध्ये राज्यात प्रथम आला आहे. त्यांच्या या यशाबद्दल जिल्हा समाज कल्याण अधिकारी मेश्राम मॅडम, सामाजिक वैद्यकीय कार्यकर्ता नखाते साहेब, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुखदेवरावजी पोकळे साहेब, मुख्याध्यापक थोरवे काकासाहेब यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.

नागपूर येथे दिव्यांग कल्याण आयुक्तालय महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने राज्यस्तरीय मुला - मुलींच्या क्रीडा स्पर्धा २१, २२, २३ मार्च रोजी आयोजित करण्यात आले होत्या. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. त्यामध्ये बीड जिल्ह्यातील वेगवेगळ्या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे. यामध्ये



आष्टी येथील शाहू महाराज निवासी मूकबधिर विद्यालयातील साबळे गणेश शहादेव गोळा फेक व ओम गजानन गायकवाड लांब उडी या गटामध्ये सहभाग घेतला होता. त्यापैकी ओम गजानन गायकवाड हा राज्यातून प्रथम क्रमांकाने विजयी झाला आहे. या स्पर्धेसाठी शाळेचे क्रीडा शिक्षक तोडकर सुधीर व शिक्षक कांबळे हनुमंत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल शाळेतील मुख्याध्यापक शिक्षक व इतर कर्मचारी सर्व स्तराकडून कौतुक केले जात आहे.

## भूमी अभिलेख अधिकारी प्रवीण मोरे यांची सरकारी कामात अडथळा केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता




केज/प्रतिनिधी

भूमी अभिलेख अधिकारी प्रवीण मोरे यांनी त्यांची आई कार्यरत असलेल्या एका सरकारी दवाखान्या तील महिला डॉक्टरांना सरकारी कामातअडथळा केल्याच्या व ढकलून देऊन धमकी दिल्याच्या आरोपातून भूमीअभिलेख अधिकारी प्रवीण मोरे यांची केज येथील जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश श्री.सु.बा. भाजीपाले यांनी निर्दोष मुक्तता केली.सदर खटल्यात ड.डी.डी. लांब,ड.व्ही.आर. कुलकर्णी यांनी काम पाहिले.सरकार पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता श्री. आर.पी.उदार यांनी बाजू मांडली.

## केज तालुक्यातील ११४ ग्राम पंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

केज/प्रतिनिधी

आगामी पाच वर्षात तालुक्यात होणाऱ्या ११४ ग्राम पंचायतीच्या निवडणुकीतील सरपंच पदाचे आरक्षण दि.२५ मार्च २०२५ रोजी मंगळवारी सकाळी ११ वाजतातहसीलदार राकेश गिड्डे यांच्या अध्यक्षते खाली केज तहसील कार्यालयाच्या सभागृहात धोत्रा येथील ४ वर्षाचे बालक देवेश विनोद मजमुले याच्या हस्ते चिठ्ठी काढून जाहीर करण्यात आले.याबाबत सविस्तर वृत्त असे की,तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी सकाळी ११ वाजता सुरु झालेली आरक्षण सोडती ची प्रक्रिया दुपारी एक वाजेपर्यंत चालली.यात सर्वसाधारण महिलांसाठी ३२,नागरिकांच्या मागास प्रवर्गातील महिलांसाठी १६,अनुसूचित जातीच्या महिलांसाठी ९ तर अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी ढाकेफळ ही एकमेव ग्रामपंचायत आरक्षित राहिली आहे.सर्वसाधारण पुरुषांसाठी ३१,नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी१५,अनुसूचित जातीसाठी ९,तर अनुसूचित जमातीसाठी एकमेव सोनी जवळा आरक्षित राहिले आहे.यावेळीतहसीलदार राकेश गिड्डे,नायब तहसीलदार आशा वाघ(गायकवाड), अशोक भंडारे,श्रीमती मेश्राम,पेशकार वैशाली भिसे,गोकुळ नन्नवरे, जब्बार पठाण यांच्यासह तालुक्यातील प्रमुख राजकीय पक्षाचे नेते, मंडळ अधिकारी,तलाठी, कार्यकर्ते,सरपंच व नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

